**मे. कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लि., शक्ती भवन नं. ८२, रेस कोर्स रोड, बेंगलुर अर्बन कर्नाटक यांच्या बरांज ओपनकास्ट माईनिंग प्रकल्प गाव सोमनाळा, बोथला, चेक बरांज, कढोली, केसुर्ली, चिचोर्डी व बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर माईनिंग लिज एरीया १४५७.२० हे.आर. विस्तारीकरण क्षमता ३.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ५.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबतच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३०/१२/२०२५ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ: मे. कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि., बरांज ओपन कास्ट् माईनिंग प्रोजेक्ट, स. नं. २९६, जुना स्टेट हायवे २६४(भद्रावती ते कोंढा फाटा) गाव बरांज मोकासा, ता. भद्रावती, जिल्हा चंद्रपूर. |

**प्रस्तावना:-**

मे. कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लि., शक्ती भवन नं. ८२, रेस कोर्स रोड, बेंगलुर अर्बन कर्नाटक यांच्या मौजा सोमनाळा, बोथला,चेक बरांज, कढोली, केसुर्ली, चिचोर्डी व बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर या ठिकाणी १४५७.२० हे.आर. खाण लीज क्षेत्रामध्ये ३.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरून ५.०० दशलक्ष टन प्रतिवर्ष पर्यंत उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या विस्तारीकरण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करून भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केला व त्यानूसार टीओआर (TOR) दिनांक ०९ ऑगस्ट, २०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि., शक्ती भवन नं. ८२, रेस कोर्स रोड, बेंगलुर अर्बन कर्नाटक यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १२/११/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर

यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन व दैनिक पुण्यनगरी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर व दि हितवाद यात इंग्रजीत दिनांक २७/११/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय अधिकारी कार्यालय वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१०. नगर परिषद कार्यालय भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११. ग्राम पंचायत कार्यालय बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय चेक बरांज मानोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१४. गट-ग्राम पंचायत कार्यालय कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१५. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १५ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-९२/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५१२२३-एफटीएस-०१८९ दिनांक २३/१२/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १९ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. नितीन व्यवहारे, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व

इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. विठ्ठल पुनवटकर, उप-सरपंच बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पाला माझा पूर्णपणे विरोध आहे. या कंपनीने शासकीय नियमानूसार पुनर्वसन केलेले नाही. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४ नूसार कंपनीकडे रू. ३.४० कोटी रूपये थकीत आहे. कंपनीने आजपर्यंत कर अदा केलेला नाही. कंपनी गावाचे पुनर्वसन करताना अटी शर्ती लावत आहे. ०६/०२/२०१३ रोजी कंपनीने गावाचा अहवाल घोषित केला. त्यामध्ये सेक्शन ४ सन २०१० मध्ये लावण्यात आला व आम्हाला सांगण्यात आले की सन २००९ प्रमाणे मोबदला मिळणार. कंपनीमुळे गावाच्या पाण्याची पातळी खालावलेली आहे. कंपनीमुळे स्थानिकांना प्रदूषणाचा त्रास होत आहे. मागील १८ वर्षांपासून कंपनीने प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता कोणतीही उपाययोजना केलेली नाही. कंपनीने अहवालामध्ये जवळचे अभयारण्य हे ताडोबा अभयारण्य असल्याचे नमूद केले आहे. परंतु या क्षेत्रामध्ये वाघाचा वावर असून जनावरांचे जीव जात आहे व त्याकरिता वन विभागामार्फत नूकसान भरपाई देण्यात येत आहे. त्यामुळे आजची जनसुनावणी रद्द करण्यात यावी. महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ कंपनीविरोधात कोणतीही कार्यवाही करत नाहीत. जोपर्यंत ग्रामपंचायतीच्या रेकॉर्ड प्रमाणे बिना अटी व शर्ती घरे संपादित करण्यात येत नाही तोपर्यंत ही जनसुनावणी रद्द करावी. मागील १८ वर्षांपासून आम्ही प्रदूषणाचा त्रास सहन करत आहोत. एम्टावाले या ठिकाणी उत्तर देणार नाहीत. केपीसीएलचे शासनाचे प्रतिनिधी येथे उत्तर देतील. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२) श्री. मोहन दुधे, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या उत्खननामुळे बरांज मोकासा गावामध्ये मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण होत आहे. परिसरामध्ये प्रदूषण वाढले, जल प्रदूषणाची समस्या निर्माण झालेली आहे. ओव्हरबर्डन जास्त प्रमाणात डंपिंग करण्यात आले आहे. पाण्यामुळे ओवहरबर्डन खचले तर संपूर्ण गाव नष्ट होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. कंपनीने उर्वरित शेतजमीन विकत घेतलेली नाही. त्यामुळे शेती करता येत नाही. गावांमध्ये भूजल पातळीत घट (कमी होणे) झाली | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. आजपर्यंत मला केवळ रुपये 4 लाख इतकीच रक्कम प्राप्त झाली आहे. | |

## ३) श्री. महेश कवडुजी मोरे, सरपंच, ग्रामपंचायत कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोंढा गावातून होणाऱ्या वाहतूकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून शेती करणे अशक्य झाले आहे. तसेच जनावरांना चारा चारणे देखील कठीण झाले आहे. नाल्याद्वारे कंपनी दूषित पाणी सोडत आहे. सन २०२१ पासून कंपनी सुरू झाली असून शेतीचे नूकसान होत आहे परंतु कंपनीने त्याची नूकसान भरपाई दिलेली नाही. जनसुनावणी घेण्यापूर्वी कोंढा गावामध्ये प्रदूषणाचे प्रमाण किती आहे याची माहिती घ्यायला पाहिजे होती. रस्त्यालगत असलेले घरेदेखील प्रदूषणामुळे खराब झालेले आहे. तसेच परिसरात बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आहे. कंपनीने वाहतूकीकरिता गावाच्या बाहेरून रस्ता काढावा. प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्याची हानी होत असून दवाखान्यात नागरीक येऊ शकत नाहीत. स्थानिकांना कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध होत नसून बाहेरच्या व्यक्तिंना रोजगार देण्यात येत आहे. त्यामुळे ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी व परत घेण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ४) श्री. देवानंद उद्धव पुनवटकर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी अपंग असून पदव्युत्तर शिक्षण घेतलेले असून कंपनीतर्फे फक्त आश्वासन देण्यात येत आहे. परंतु नौकरी दिलेली नाही. कंपनीतर्फे मोबदल्याची अर्धीच रक्कम देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सदर कंपनी नेत्यांच्या खिशात आहे व त्यांचीच प्रगती करण्यात येत आहे. स्थानिकांना सन २००९ चे दस्ताऐवज मागण्यात येत आहेत. लोक प्रभावित झाले आहेत. ब्लास्टिंगमुळे प्रतिकूल परिणाम झाले आहेत. लोकांच्या वतीने निर्णय कोणी घेतला? ही खाण तात्काळ बंद करण्यात यावी. योग्य व पुरेशी भरपाई देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

५) श्रीमती शशिकला किशोर इंगोले, सरपंच, ग्रामपंचायत कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या वाहतूकीमुळे स्थानिका विद्यार्थ्यांना प्रदूषणाचा त्रास होत आहे. धुळीच्या प्रदूषणामुळे नागरीकांना त्रास होत आहे व अपघाताचे प्रमाण देखील वाढलेले आहे. कंपनीने गावातून होणारी वाहतूक बंद करावी कारण वाहतूकीमुळे धुळीचे प्रदूषण होत आहे व शेतकऱ्यांचे नूकसान होत आहे. कंपनीची वाहतूक बंद न झाल्यास त्याविरोधात आंदोलन करण्यात येईल. कंपनीने पर्यायी मार्ग तयार करावा व वाहतूक करावी. कंपनीने शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६) श्री. सचिन चालतुरे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने जे काही पर्यावरण विषयक सांगितले ते पूर्णत: खोटे आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोंढा नाल्याची पाहणी करावी. कोंढा नाला मोठ्या प्रमाणात प्रदूषित झालेला आहे. कोंढा नाल्याच्या प्रदूषित पाण्याचा पुरवठा भद्रावती शहराला करण्यात येत आहे. कोंढा गावाच्या रस्त्यालगत असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान झालेले आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७) श्री. संतोष उद्धव पुनवटकर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या शेतामध्ये या कंपनीने जबरदस्ती खड्डा खोदला. तसेच आम्हाला रोजगार दिला नाही व शेतीचा मोबदला देखील दिला नाही. कंपनीला तेव्हाच बंद करायला पाहिजे होते परंतु कंपनी आजही सूरू आहे. या कंपनीला लवकरात लवकर बंद करून वे.को.लि. ला सदर खाण आवंटीत व्हायला पाहिजे. कंपनीकडून कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

८) **श्री. सचिन अभिमान ढोके, गट-ग्रामपंचायत कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने पर्यावरणाविषयक कोणत्या उपाययोजना केल्या याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच कंपनीने गावकऱ्यांच्या मागण्या लेखी स्वरूपात पूर्ण केलेल्या नाहीत. ग्रामसभा घेऊन ठराव पारित करून कंपनीला देण्यात आले परंतु कंपनीकडून आजपर्यंत उत्तर प्राप्त झाले नाही. कंपनीच्या प्रदूषणामुळे जनावरे, लहान बाळ यांना मोठ्या प्रमाणात आजार होत आहेत. कंपनीने स्थानिकांकरिता दवाखाना तयार करून मोफत उपचार करण्यात यावा. कंपनीने परिसरातील एकही ग्रामपंचायतीमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली नाही. कंपनी परिसरातील पाण्याची तपासणी करते परंतु त्यानंतर त्यावर कोणत्याही प्रकारची उपाययोजना करत नाही व त्याबाबत स्थानिकांना माहिती देण्यात येत नाही. तसेच कंपनीने एकही ग्रामपंचायतीला विश्वासात घेतलेले नाही. एकही शेतकऱ्याला रस्त्याच्या धुळीच्या प्रदूषणामुळे नूकसान भरपाई मिळालेली नाही. शासनाच्या निर्णयाप्रमाणे आजपर्यंत यादी मिळालेली नाही. त्यामुळे कंपनीला परवानगी नाकारण्यात यावी. कंपनीने सर्व ग्रामपंचायतींना लेखी उत्तर पाठवावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

९) **श्री. अरविंद देवगडे, प्रकल्पग्रस्त कामगार, बरोज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाणीमध्ये १८० कामगार काम करत आहेत. कंपनीने सादरीकरणादरम्यान सांगितले की, कामगारांना मास्क व ग्लोव्ह्ज पूरविण्यात येत आहेत. परंतु कामगारांना कोणतीच व्यवस्था पूरविली जात नाही. कंपनीसोबत जोडे मिळण्याकरिता वेळोवेळी भांडण करावे लागते. कामगारांना काही दुखापत झाल्यास फर्स्टएडची सुविधा देण्यात येत नाही. गेल्या ५ वर्षांपासून कंपनीसोबत वेतनासाठी लढा सुरू आहे परंतु आजपर्यंत वेतन मिळाले नाही. माझी प्रदूषण नियंत्रण विभागाला विनंती आहे की, सदर खाणीला विस्तारीकरणाची परवानगी देण्यात येऊ नये. परवानगी मिळाल्यास खाण ५ वर्षात उत्खनन करून | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | बंद करण्यात येईल. ही खाण बंद झाल्यानंतर येथील लोकांचे काय होणार? डॉक्टरांची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. | |

## १०) श्री. राजेश हरिभाऊ मत्ते, तंटामुक्ती अध्यक्ष, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनी सन २००७ पासून परिसरात कार्यरत आहे. परिसरातील कोंढा, कढोली, किलोनी, माजरी हे गाव प्रदूषणाने त्रस्त आहेत. तसेच या गावांमध्ये कर्करोग, दमा यासारख्या आजाराने ग्रामवासी ग्रस्त आहेत. कंपनीने पडोली, माजरी, कोंढा, कढोली या गावांमध्ये आरोग्य विषयक सुविधा पूरविलेली नाही. कंपनीला कोळसा उत्खननाची क्षमता वाढविण्यासाठी जनसुनावणी घेण्यात येत आहे. कंपनीने सर्वप्रथम परिसरातील प्रदूषणावर नियंत्रण करावे व त्यानंतरच विस्तारीकरण करावे. कंपनीने आजपर्यंत फक्त तोंडी आश्वासने दिलेली असून लेखी आश्वासने दिलेली नाहीत. सामान्य नागरीकांच्या समस्याचे निराकरण कंपनी करत नाही. सन २००७ पासून आम्ही १०-१२ शेतकरी मोबदला व रोजगारासाठी कंपनीसोबत लढत आहोत. कंपनीने स्थानिकांना आजपर्यंत रोजगार दिलेला नाही. बाहेरच्या राज्यातील जसे की उत्तरप्रदेश, बिहारच्या व्यक्तिंना कंपनीमध्ये रोजगार देण्यात येतो. आम्ही कंपनीला वेळोवेळी स्थानिकांना रोजगार देण्याबाबत विचारणा करतो परंतु कंपनी त्याचे उत्तर देत नाही. कंपनीकडे उत्तर मागायला गेल्यास पोलिस प्रशासन येते. कंपनी स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यास चर्चा करण्यास तयार नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कोंढा गावाच्या रस्त्याची पाहणी करावी. सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. कंपनी प्रदूषण नियंत्रणासाठी कोणतीही कार्यवाही करीत नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

११) श्री. पूर्णिमा दुधाराम शेंडे, प्रकल्पग्रस्त, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावामध्ये पाण्याची खूप मोठी समस्या आहे. पहिली बोरवेल ब्लास्टींगमुळे बंद पडली. कंपनीने दुसरी बोअरवेल करून दिली परंतु ती देखील ब्लास्टींगमुळे बंद पडली. बोअरवेल मधून येणारे पाणी अत्यंत खराब आहे. सदर पाणी पिण्यास अयोग्य आहे. बरांज गावामध्ये नेटवर्कचा त्रास आहे. स्वस्त धान्याच्या दुकानामध्ये तासन्तास उभे राहावे लागते. कंपनीकडे वारंवार निवेदन देऊन देखील कंपनी याकडे दुर्लक्ष करत आहे. स्थानिक बेरोजगारांना कंपनीतर्फे नौकरी देण्यात येत नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१२) श्री. राजेंद्र डोंगरे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती तथा उप-सरपंच, ग्रामपंचायत चेक बरांज, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चेक बरांज व बरांज मोकासा यागावातील स्थानिकांना विस्तारीकरण प्रकल्पामध्ये किती प्रमाणात रोजगार मिळणार आहे याची माहिती देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१३) श्री. देवेंद्र सूर्यभान वानखेडे, प्रकल्पग्रस्त, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी सन २०२१ पासून सुरू झाली असून ५ वर्षापासून बरांज गावाचे पूर्णपणे पुनर्वसन करण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे व कंपनीला प्रशासनाच्या पाठिंबयामुळे पुनर्वसन करण्यात आलेले नाही. माझे घर कंपनीने अपात्र केलेले आहे. मागील एक वर्षापासून मी संवैधानिक पद्धतीने याबाबत लढा देत आहोत परंतु याबाबत तोडगा निघालेला नाही. उपविभागीय कार्यालयामध्ये ४-५ वेळा अर्ज दाखल केलेला असून २ वेळा सुनावणी होऊन देखील माझे घर पात्र झालेले नाही. या ठिकाणी कमीशन देणाऱ्या व्यक्तिचे घर पात्र करण्यात येते. संवैधानिक पद्धतीने कंपनी घर घेत नाही तोपर्यंत | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आम्ही आमचे घर देणार नाही. जोपर्यंत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत आमचा या कंपनीला विरोध आहे. गावामध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेची मागणी करत आहे व प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे मागणी केली आहे हा आमचा गुन्हा झालेला आहे. त्यामुळे माझ्या घराचे पुनर्वसन होत नाही आहे. माझी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी संवैधानिक पद्धतीने बरांज गावाचे पुनर्वसन करावे. | |

## १४) श्रीमती चौधरी, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावामध्ये खूप मोठ्या प्रमाणात डस्ट आहे व त्याचा त्रास आम्हाला होत आहे. कंपनीने गावातून वाहतूक बंद करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## १५) श्री. निलेश कोरडे, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे रोजगार मिळत नाही. जनावरांचा मृत्यू होत आहे. कंपनीच्या प्रदूषणामुळे जनावरांमध्ये दुधाचे प्रमाण कमी झालेले आहे. कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांची मदत करावी. जनावरांच्या चरण्यासाठी कोणतीही जमीन उपलब्ध नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## १६) श्री. विशाल दुधे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी स्थानिक नागरीक त्यांच्या समस्या मांडत आहेत व त्याबाबत प्रशासनाकडून उत्तरे अपेक्षित आहेत. यापूर्वी मी २ आक्षेपपत्र जिल्हाधिकारी कार्यालय व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केले आहेत. दि. २०/०२/२०२५ रोजी EC क्रं. २४८०१०AMH५५६०२०८ अन्वये ३२ लाख टन उत्खननासाठी परवानगी देण्यात आली आहे. सदर उत्खननापेक्षा २० टक्के जास्त उत्पादनाकरिता | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आपण मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये आपल्यातर्फे काही अटी व शर्ती घालून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये नमूद ठराविक अटी व शर्तींचे पालन झाले किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. त्यामध्ये प्रामुख्याने "PP shall construct permanent boundary wall all along the boundary wall of Ordinance Factory within १ year." त्याकरिता ३ महिन्याचा कालावधी देण्यात आला होता व रू. २०० लाख खर्च करायचे होते. परंतु आजपर्यंत त्यांची संरक्षण भिंत उभारण्यात आलेली नाही. जर कंपनीतर्फे अटी व शर्तींचे पालन होत नसेल तर सदर जनसुनावणी कशासाठी आयोजित करण्यात आली याची माहिती देण्यात यावी. जर कंपनी पर्यावरण मंजूरीतील अटी व शर्तींचे पालन करण्यास असमर्थ असेल तर सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. जोपर्यंत कंपनीतर्फे पर्यावरणीय मंजूरीतील अटी व शर्तींची पूर्तता होत नाही तोपर्यंत कंपनीला विस्तारीकरणाबाबत मान्यता देण्यात येऊ नये. चिचोर्डी गावातील ५० मीटर अंतरावर १८५ हेक्टर जमीन डिसेंबर २०१६ मध्ये झालेल्या करारानूसार विस्तारीकरणासाठी संपादित करण्यात येणाीर असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु कंपनीने १० वर्षे उलटून देखील जमीन संपादित करण्यात आली नाही. नजिकच्या काळात नागपूर येथे झालेल्या बैठकीदरम्यान सांगण्यात आले होते की केपीसीएल कंपनीद्वारे चिचोर्डी येथील जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे. चिचोर्डी येथे वायु प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात आहे. जोपर्यंत १८५ हेक्टर जमीनीचे अधिग्रहण कंपनी करत नाही तोपर्यंत कंपनीला ५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादनाची परवानगी देण्यात येऊ नये. मा. पर्यावरण मंत्री, भारत सरकार श्री. भुपेंद्र यादव व मा. सौ. पंकजाताई मुंढे, मंत्री पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांनी मी विनंती करतो की त्यांच्याकडे जनसुनवणी नंतर येणाऱ्या प्रस्तावामध्ये ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादनाच्या अटी व शर्तींची पूर्तता करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी व त्यानंतरच परवानगी देण्यात यावी. सदर पर्यावरणीय मंजूरी मध्ये आणख एक मुद्दा असा होता की, "PP shall construct Sewage Treatment Plant (STP) within one year" व त्याकरिता रू. ५० लाख खर्च करावयाचे होते. याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने | |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. त्याचे प्रत माझ्याकडे माहितीच्या अधिकाराअन्वये उपलब्ध आहे. त्यामध्ये प्रस्तावित निर्देशाची प्रत देण्यात आली होती. त्यामध्ये You have not provided ETP for workshop & vehicle washing effluent and effluent is being discharged on land near coal transportation roadside. तसेच you have not provided tyre washing system. कंपनीने आजपर्यंत टायर वॉशिंग सिस्टम बसविलेली नाही. त्यांच्या खाणीतून निघणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणा होणार नाही हे कसे शक्य आहे. मला मान्य आहे की या देशामध्ये उद्योगांची गरज आहे. देशाच्या आर्थिकीकरणासाठी व विकासासाठी उद्योग येणे महत्तवाचे आहे. परंतु माणसाचा जगण्याचा उद्देश राखला गेला पाहिजे. कंपनीने बफर झोन उभारलेला नाही. कंपनीने ग्रीन बेल्ट बफर झोन क्षेत्र उभारायला पाहिजे होता. तसेच कंपनीने फिक्सड टाईप वॉटर स्प्रिंक्लिंग सिस्टम बसविलेली नाही. तसेच you have provided only kachha lagoon instead of sedimentation tank with baffle wall & mine water discharged into local nalla which finally meets kondha nalla असे या नोटीसमध्ये नमूद आहे. कंपनीची ४००-५०० वाहनांची वाहतूक दररोज करण्यात येते परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन दिसून येत नाही. त्यामुळे परिसरातील कोंढा, बरांज, मोकासा येथील नागरीकांना धुळीचा त्रास होत असून आरोग्याचर विपरीत परिणाम होत आहे. देशामध्ये मानव जीवन महत्त्वाचे आहे की उत्पादन महत्त्वाचे आहे याबाबत भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने विचार करणे गरजेचे आहे. कंपन्यामार्फत प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन होत असेल तर भारताचे भविष्य धोक्यात असल्याचे दिसून येते. कंपनीकडे किमान ४ वायु गुणवत्ता तपासणी यंत्रणा असणे गरजेचे आहे. शेजारच्या कंपनीमध्ये ४ वायु गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविलेली आहे. त्यामध्ये PM१०, PM २.५ व इतर घटकांची माहिती देण्यात येते. कंपनीची हवा गुणवत्ता निर्देशांक दर्शविणारी यंत्रणा कुठे लावण्यात आली आहे याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीने ७ दिवसांच्या आत याबाबत उत्तर देणे अपेक्षित होते परंतु कंपनीने उत्तर दिलेले नाही. सदर कंपनीवर ७ दिवसाच्या म.प्र.नि. मंडळाकडून कार्यवाही अपेक्षित होती. म.प्र.नि. मंडळाने एका वर्षात | |

| | | |
| --- | --- | --- |
| | फक्त बँक हमी केलेल्या आहेत. बँक हमी जप्त करून कंपनीवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. रू. ५ लाख, १० लाखची बँक हमी जप्त करून काहीही साध्य होऊ शकत नाही. इतक्या प्रमाणात कार्यवाही करून देखील मागील एका वर्षात कंपनीमध्ये सुधारणा होत नसेल तर कंपनीची CTE, CTO आणि पर्यावरणीय मंजूरी रद्द करण्यात यावी अशी मी महाराष्ट्र शासन व भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाला करतो. वायु प्रदूषण कायदा १९८१ च्या कलम ३१अ नूसार व जल प्रदूषण कायदा १९७४ च्या कलम ३३अ नूसार उल्लंघन झालेला आहे. ज्याअर्थी सदर KPCL कंपनी कडून समस्याचे गैर अनुपालन असल्याकारणाने आपल्याद्वारे कलम ३३ (A) निर्देश नुसार उद्योग बंद करण्याचे निर्देशची तरतूद असताना आपल्या द्वारे उद्योग बंद करण्याची कारवाई आपलया विभागार्मात केली गेली नाही. ज्याअर्थी सदर KPCL कंपनी कडून समस्याचे गैर अनुपालन असल्याकारणाने आपल्याद्वारे कलम ३३ (A) निर्देश नुसार पाणी पुरवठा वीज पुरवठा व इतर सेवांचा पुरवठा बंद करण्याचे निर्देशची तरतूद असताना आपल्या द्वारे कारवाई केली गेली नाही. ज्याअर्थी सदर KPCL कंपनी कडून सतत उलंघन (१ वर्ष पेक्षा जास्त काळ चालू राहिल्यास २ ते ७ वर्षापर्यंत शिक्षा वाढू शकते आणि अतिरिक्त दंड आकाराला जातो याची सुद्धा आपल्याला कार्यालय द्वारे कारवाई केली गेली नाही. फक्त कंपनीची बँक हमी जप्त करण्याव्यतिरिक्त कोणतीही कारवाई केली गेली नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे, २०२५ मध्ये कंपनीच्या संमतीपत्राचे नूतनीकरण करून दिले होते. त्यामध्ये काही अटी व शर्ती दिलेल्या होत्या परंतु आजपर्यंत कंपनीने एकाही अटी व शर्तीचे अनुपालन केलेले नाही. ज्याअर्थी भारतीय पर्यावरण विभाग द्वारा आपल्याला कार्यालय ला प्राप्त EC NO :- २४४०१०१MH५५०६०२०N नुसार पृष्ट क्रमांक 12 मधील TERM & CONDITION तरतुदीचे अनुपालन न केल्याचे तक्रार पत्र आपल्याला देण्यात आले होते. त्यानंतर उप-प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत मोका पंचनामा अहवाल घेण्यात आलेला आहे. पर्यावरणीय मंजूरीमध्ये आणखी एक अट पुढीलप्रमाणे आहे- "No coal transportation shall be done through sensitive locations such as villages, hospitals | |

schools etc." कोळसा वाहतूकीकरिता कंपनीने पर्यायी वाहतूकीची व्यवस्था करावयाची होती. तसेच कंपनीला पर्यावरणीय मंजूरीनूसार एक वर्षाच्या कालावधीमध्ये कोळसा वाहतूकीसाठी कन्व्हेअर बेल्टची सुविधा पूरवायची होती परंतु त्यांनी ती सुविधा पूरविलेली नाही. सद्य:स्थितीत अभ्यास सुरू असल्याचे समजते तर त्यांना अभ्यास पूर्ण करण्याची संधी देण्यात यावी. विस्तारीकरणाला परवानगी देण्यास घाई कशाची आहे. कोंढा ते चालबर्डी गावादरम्यान रस्त्यावर १०० मीटर अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तित्वात आहे. तसेच १५० मीटर अंतरावर शाळा आहे. ३-४ माध्यमिक महाविद्यालये आहेत. कोंढा वसतीच्या मध्यामधून कोळसा वाहतूक करण्यात येतो. खूप मोठ्या प्रमाणात या परिसरात कोळसा वाहतूकीमुळे वायु प्रदूषण होत आहे. त्या रस्त्यावर फक्त ४ माणसं रस्त्याची साफसफाई करताना आढळतात. यामुळे वायु प्रदूषण आटोक्यात येऊ शकते काय? २.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादन सन २०११ पासून होत असून आजपर्यंत कंपनीने औद्योगिक सांडपणी प्रक्रिया सयंत्रणा तसेच घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविलेली नाही. वृक्षारोपण केलेले नाही. त्यामुळे शासन यांना ५.० दशलक्ष टन प्रतिवर्षासाठी कोणत्या आधारावर मान्यता देणार आहे. फक्त बँक हमी जप्त करून गावातील पर्यावरणाचा समतोल राखल्या जाऊ शकत नाही. माणसाच्या डोक्यावर अंदाजे ८०,००० ते १,२०,००० इतके केस असतात. परंतु आज बरांज गावामधील पुरूषांच्या डोक्यवर प्रदूषणामुळे केस राहिलेले नाहीत. माणसाचे आरोग्य कसे खराब होऊन राहिले आहे त्याबाबतचे उदाहरण आहे. बरांज हे गाव खाण क्षेत्रापासून अंदाजे १०० मीटर अंतरावर आहे. आजपर्यंत गावाचे पुनर्वसन झालेले नाही. कंपनीचे म्हणणे आहे की गावकरी पुनर्वसनास अपात्र आहेत. तसे असल्यास सदर खाण देखील अपात्र आहे. जर गावकरीच अपात्र आहेत तर यांची खाण या क्षेत्रात काम करण्यास कशी पात्र आहे हा माझा प्रशासनाला प्रश्न आहे व कंपनीकडून याचे उत्तर अपेक्षित आहे. सदर कंपनीने अस्तित्वात असलेल्या पर्यावरणीय मंजूरीच्या अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे त्यांची अस्तित्वात असलेली ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादनाची पर्यावरणीय मंजूरी देखील बरखास्त करण्यात यावी. म.प्र.नि. मंडळाकडून प्राप्त झालेले CTO आणि

| | | |
|---|---|---|
| | CTE देखील रद्द करण्यात यावे. जोपर्यंत पर्यावरण विषयक नियोजनबद्ध काम होत नाही तोपर्यंत कंपनीला कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येऊ नये. कंपनीने ७५ लाख मेट्रीक टन कोळसा वन क्षेत्रातून यांनी उत्खनन केले. कंपनीला दि. ११/०७/२०२२ रोजी वन विभागाकडून शेतसूचीच्या अटी व शर्तीसह परवानगी देण्यात आली होती. प्रस्तावनेमध्ये दुरूस्ती करण्यात यावी. त्यामध्ये जोपर्यंत बरांज मोकासा गावाचे पुनर्वसन करण्यात येत नाही तोपर्यंत यांना वन क्षेत्रामधून उत्खनन करण्यास मनाई होती. सदर उत्खननामुळे निलेश कोरडेच्या ८ गाईंचा मृत्यू झाला. श्री. अरविंद देवतळे यांच्या आईचा मृत्यू झाला. तसेच प्रदूषणामुळे झालेल्या अपघातामध्ये कोंढा गावामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला. कोणत्या पद्धतीचा प्रदूषणाचा व पर्यावरणाचा समतोल राखण्यात येत आहे हा माझा प्रश्न आहे. श्री अरविंद देवतळे यांच्या आईचा कंपनीच्या ताराच्या कुंपणाजवळ वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. दोन दिवसांनंतर त्यांच्या मृतदेह सापडला व त्यानंतर त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येते. असे घडत असताना देखील कोणत्या नियमांच्या आधारे सदर केपीसीएल खाणीचे स्क्रिनींग, स्कोपिंग करून जनसुनावणीचा प्रस्ताव मा. पर्यावरण मंत्री भारत सरकार यांनी जिलहाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे पाठविले असा माझा प्रश्न आहे. सदर प्रस्ताव रद्द करण्यात यावा. जोपर्यंत सर्व समस्यांचे निराकरण होत नाही व प्रदूषणावर नियंत्रण करण्यात येत नाही तोपर्यंत सदर विस्तारीकरणाला मान्यता देण्यात येऊ नये अशी विनंती मी मा. पर्यावरण मंत्री महाराष्ट्र शासन यांना करीत आहे. मा. मंत्री यांनी सत्यावर आधारित अहवालावर कंपनीकडून स्पष्टीकरण घेण्यात यावे. रोजगारासाठी हजारो संधी या देशामध्ये उपलब्ध आहेत. कंपनीने चालवलेला प्रकार हा एक प्रकारची हत्या आहे. आपल्या शेजारच्या चाईना या देशामध्ये जाऊन पाहिले तर त्या ठिकाणी पर्यावरण संरक्षणाला सर्व प्रथम प्राधान्य दिले जाते. त्या ठिकाणच्या उद्योजकांकडून पर्यावरणाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. दररोज त्याचे मॉनिटरींग केले जाते. आपल्या देशात त्याप्रकारची सुविधा नाही आहे. परंतु एखाद्या कंपनीबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी येत असतील तर त्या ठिकाणी प्रदूषण नियंत्रण मंडळाने मॉनिटरींग केले पाहिजे. आज या ठिकाणी सरपंच, उपसरपंच व नागरीकांचा या कंपनीला | |

| | | |
|---|---|---|
| | विरोध आहे. सन २०२० मध्ये आम्ही या कंपनीला चालु करण्यासाठी पाठिंबा दिला होता. कारण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यावेळी आश्वासन दिले होते की ३ महिन्यांमध्ये गावाचे पुनर्वसन करण्यात येईल. परंतु कंपनी चालू होऊन उत्खननातून कंपनीला फायदा होत असल्यामुळे कंपनीला पुनर्वसनाच्या आश्वासनाचा विसर पडलेला आहे. कंपनी पुनर्वसनाबाबत अटी शर्ती घालून स्थानिकांना त्रास देत आहे. ७५ लाख मेट्रीक टन कोळसा उत्खननाबाबत मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी विनंती आहे की याची सखोल चौकशी करावी. वन क्षेत्रातून होत असलेले उत्खनन हे या संबंधीचा विषय आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. ३ दिवसांपूर्वी कोळसा मंत्री श्री. किशन रेड्डी साहेबांची मी भेट घेऊन त्यांना २८५ नागरीकांच्या स्वाक्षऱ्याचे निवेदन दिले. त्यांनी याबाबत सखोल चौकशी करून कृती आराखडा तयार करण्याबाबत आश्वासन दिले आहे. त्यामुळे या प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घ्यावी ही विनंती आहे. सदर प्रकरणाची गंभर दखल न घेतल्यास बरांज येथील रहिवाशांना जंतर मंतर व पर्यावरण मंत्री यांच्या घराबाहेर आमरण उपोषण करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. बफर झोन उपलब्ध नाही, ग्रीन बेल्ट विकसित करण्यात आलेला नाही, यांत्रिक झाडू (मेकेनाईज्ड स्वीपिंग मशीन) उपलब्ध नाहीत, गावांमधून वाहतूक होऊ नये यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था केलेली नाही तसेच केवळ एकच सतत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचे मापन केंद्र (CAAQMS) बसविण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे C२E, C२O व पर्यावरणीय मंजुरी (EC) रद्द करण्यात याव्यात. कोळसा वाहतुकीसाठी इतर मार्गाचा वापर करण्यात यावा, कन्व्हेयर बेल्ट प्रणालीद्वारे कोळसा वाहतूक करावी तसेच सार्वजनिक आरोग्य केंद्रे व शाळांची व्यवस्था करण्यात यावी. हा प्रकल्प पात्र नाही. प्रदूषणामुळे तसेच अपघातांमुळे जनावरांचा मृत्यू झाला आहे. मी या प्रकल्पास तीव्र विरोध करीत आहे. | |

१७) **श्री. गणराज दशरथ पुनवटकर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा मुलगा या कंपनीमध्ये कार्यरत होता व त्याचा कामावर असताना मृत्यू झाला. मुलाच्या मृत्यूनंतर कंपनीकडून एकही रुपया मिळाला नाही. कंपनीने माझे घर संपादित केले व मोबदल्याच्या रकमेमधून देखील त्यांनी रू. ६.० लाख कपात केले. माझी विनंती आहे की सदर रक्कम आम्हाला देण्यात यावी. कंपनीने सन २००९ पासून आजपर्यंतचा हिशोब करून आम्हाला मोबदला द्यावा. काही नागरीकांना रू. २.५० लाख देण्यात आले आहे ते देखील आम्हाला देण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१८) **श्रीमती मनिषा प्रकाश हिंगणे, सरपंच, ग्रामपंचायत बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज या जनसुनावणीच्या निमित्ताने मी माझ्या ग्रामपचांयतीला येणाऱ्या समस्या प्रशासनाकडून तोडगा निघणार या उद्देशाने उपस्थित करत आहे. बरांज मोकासा प्रकल्पाच्या मध्यभागी वसलेला गाव आहे. बरांज मोकासा गावाची पुनर्वसन प्रक्रिया शासनाच्या नियमाप्रमाणे करण्यात येत नाही. कंपनीने गावातल्या परिस्थितीतकडे प्रशासनाने लक्ष द्यायला पाहिजे. कंपनीच्या उत्खननाबाबत आम्ही गावकरी बोलणे योग्य नाही, त्याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. परंतु प्रशासनाने पुनर्वसनाकडे जातीने लक्ष दिले पाहिजे. गावातील स्थानिकांचा पात्र-अपात्रतेचा विषय तात्काळ निकाली काढला पाहिजे. आज पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण होत नाही हा सर्वात गहन प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. परिसरातील पाण्याची पातळी खालावण्याचे मुख्य कारण खाणकाम आहे. ब्लास्टींगचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. ब्लास्टींगवर नियंत्रण असायला पाहिजे. माझ्या गावातील युवकांना १०० टक्के रोजगार मिळाला पाहिजे परंतु रोजगार मिळत नाही. आमच्या गावातील नागरीकांना कंपनीमध्ये रोजगार देण्यात यावा. तसेच | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पुनर्वसन धोरणाची योग्य अंमलबजावणी करून गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. प्रदूषणावर देखील कंपनीने नियंत्रण करून प्रदूषणाची समस्या निकाली काढावी. ब्लास्टिंगमुळे शाळेतील विद्यार्थी घाबरून जात आहेत. माझ्या गावातील नागरिकांना १००% रोजगार उपलब्ध करून द्यावा. प्रदूषणाची समस्या तात्काळ सोडविण्यात यावी. | |

### १९) श्री. रमेश बुक्क्या, उप-सरपंच, ग्रामपंचायत बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावाच्या पुनर्वसनाची प्रक्रिया धिम्या गतीने सुरू आहे. त्यामध्ये पात्र-अपात्र घरे आहेत. कंपनीच्या मुख्यालयात स्थानिकांच्या मोबदल्याची रक्कम स्थगित करण्यात आली आहे ती लवकरात लवकर स्थानिकांना देण्यात यावी. तसेच स्थानिकांना खाणीमध्ये १०० टक्के रोजगार उपलब्ध करून द्यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

### २०) श्री. रोशन बुरगुडे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कढोली येथील एका रहिवाशाचे म्हणणे आहे की कंपनी रू. ५०,०००/- पासून बोली लावते. त्याचा अपघात झाल्यानंतर कंपनीशी संपर्क साधला असता कंपनीने रू. ५०,०००/- पासून बोली लावण्यास सुरू केली. कंपनीने त्या इसमाचा उपचार करण्याऐवजी त्याची बोली लावून त्याची हेळसांड केली असा माझा कंपनीवर आरोप आहे. त्या व्यक्तिचा उदर्निर्वाह त्याच्यावरच अवलंबून होते. भरधाव अवजड वाहतूकीमुळे सदर इसमाचा अपघात झाला होता. वाहतूक करणाऱ्या चालकांना ट्रीप अलावन्स मिळते त्यानूसार वाहन चालकांचा वेग मर्यादेपेक्षा जास्त असतो व त्यामुळे अपघात होत आहेत. गावामध्ये प्रदूषणाची समस्या खूप जास्त आहे ती नियंत्रणात आणण्यात यावी. तसेच गावातील अनेक समस्यांचे निराकरण कंपनीने करावे अन्यथा ही जनसुनावणी घेण्यास काहीही अर्थ नाही. गावातील समस्यांवर तोडगा न निघाल्यास आम्ही आंदोलन करू. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२१) **श्री. निखील रामचंद्र निखाडे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील दोन वर्षांपासून मी कंपनीकडे रोजगार मागत आहे परंतु कंपनी रोजगार देण्यास टाळाटाळ करत आहे. जर आम्ही कंपनीची गाडी अडवली तर पोलिसांमार्फत दबाव टाकून आम्हाला हटवण्यात येते. तसेच वारंवार बोलवून कंपनी आमची हेळसांड करत आहे. आमची शेती अधिग्रहीत करून देखील आम्हाला रोजगार देण्यास कंपनी टाळाटाळ करत आहे. मागील दोन वर्षांपासून मला कोणताही रोजगार मिळालेला नाही. मी माझी जमीन गमावली आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२२) **श्री. जयेश सुरेश घाटे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे ITI होऊन आहे व माझ्याकडे वाहन चालकाचा परवाना असून देखील कंपनी मला रोजगार देण्यास टाळाटाळ करत आहे. माझी अधिग्रहीत करण्यात आली आहे. मला कंपनीतर्फे शिफारस पत्र मिळाले व ते घेऊन मी जवळच्या पीएम कंपनीमध्ये गेलो असता मला त्या कंपनीकडून सांगण्यात आले की स्थानिकांना रोजगार देण्यात येत नाही. तसेच त्या कंपनीने बाहेरच्या व्यक्तिंना वाहनचालक या पदावर नेमले. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२३) **श्री. राजकुमार नानाजी चिंचोळकर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या घराचा उदर्निर्वाह आम्हा दोघा भावांवर अवलंबून असमन कंपनीमध्ये रोजगार मागायला गेले असता कंपनी रोजगार देण्यास टाळाटाळ करत आहे. कंपनी मागील दोन वर्षांपासून रोजगार देण्यास टाळाटाळ करत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२४) **श्री. अतिश नागपुरे, प्रकल्पग्रस्त, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०१० मध्ये माझी संपादित करण्यात आली असून मी प्रकल्पग्रस्त असून देखील मला आजपर्यंत प्रकल्पामध्ये नौकरी मिळालेली नाही. याबाबत वेळोवेळी अर्ज सादर करून पाठपुरावा करून देखील माझ्या समस्येचे निराकरण करण्यात आलेले नाही. मला याबाबत रू. २५-३० लाखांपर्यंत नूकसान भरपाई देण्यात यावी. महाराष्ट्र शासन व कंपनीमध्ये पूर्वी झालेल्या व नवीन कराराप्रमाणे मला नूकसान भरपाई देण्यात यावी. तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र मिळत नाही, याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचे कारण स्पष्ट करण्यात यावे. प्रशासनाचे म्हणणे आहे की जमीन खाजगी कंपनीने अधिग्रहीत केली असल्याने प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देऊ शकत नाही. याबाबत लेखी स्वरूपात स्पष्टीकरण देण्यात यावे. सन २०१० पासून आमची जमीन कंपनीने अधिग्रहीत करून देखील आम्हाला कंपनीने नौकरी का नाही दिली याबाबत उत्तर अपेक्षित आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२५) **सौ. सविता अशोक सोनटक्के, प्रकल्पग्रस्त, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावातून अवजड वाहतूक होत असून त्यामुळे अपघात होत आहेत व त्याचा मोबदला मिळत नाही. त्याबाबत आम्ही वेळोवेळी नूकसान भरपाईसाठी आंदोलने करण्यात आली. तरी देखील कंपनी नूकसान भरपाई देण्यात टाळाटाळ करत आहे. कंपनीने गावातून होणारी वाहतूक पूर्णपणे बंद करावी ही गावकऱ्यांची प्रमुख मागणी आहे. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून वाहतूक वळवावी व आमच्या गावातून कायमची वाहतूक बंद करावी. ३-४ महिन्यापूर्वी आमच्या गावात अपघात झाला परंतु कंपनीने मोबदला दिलेला नाही. पोलिस प्रशासन स्थानिकांवर गुन्हा दाखल करण्याची चेतावणी देतात व गावकरी तेथून दूर होतात. कंपनीने आमच्या गावातून | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वाहतूक बंद करावी अन्यथा याबाबत कठोर पावले उचलण्यात येईल. | |

२६) **श्री. जोशिल अभिमान रामटेके, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी प्रशासन रू. ५०,०००/- पासून बोली लावते. पोलिस प्रशासनाकडे गेले असता पोलिस प्रशासन मृत्यू झाल्यानंतर चक्का जाम करण्यास सांगतात. श्री. देठे यांच्या मुलाचा अपघातात मृत्यू झाल्यानंतर कंपनीचे व्यवस्थापक त्याच्या उपचाराच्या रकमेबाबत बोली लावत होते. आमच्या गावातून होणारी ट्रक वाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी व अन्य पर्यायी मार्गाचा अवलंब करण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२७) **सौ. पल्लवी आकाश देवगडे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. कोंढा गावातून वाहतूक चालु देणार नाही. कोंढा गावातील नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. वाहतूकीदरम्यान नागरीकांवर कोळशाचा दगड पडत असून त्यांना जखमा होत असून त्याबाबत कंपनी काहीही करत नाही. कंपनी स्थानिकांचे म्हणणे ऐकत नाही. आमच्या गावात मोठ्या प्रमाणावर धुळीचे प्रदूषण पसरत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२८) **सौ. प्रेमिला विजय कुरेधन, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. कोंढा गावातून वाहतूक चालु देणार नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२९) <u>सौ. पल्लवी कोरडे, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ब्लास्टींगच्या तीव्रतेमुळे घरातील भांडे खाली पडत आहे. ब्लास्टींगमुळे घर पडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार याची माहिती देण्यात यावी. ब्लास्टींगमुळे मोठ्या प्रमाणात खराब पाणी नळाला येत आहे व ते पिण्यास अयोग्य आहे. पाण्याचा रंग काळा आहे. जिल्हा प्रशासनाने स्थानिकांच्या समस्या सोडवाव्या. प्रशासनाने कंपनी बंद करावी किंवा स्थानिकांचे पुनर्वसन चांगल्या प्रमाणे करावे. पुनर्वसन न केल्यास आम्ही गावकरी मिळून कंपनी बंद करू. शासनाने किंवा पोलिस प्रशासनाने यामध्ये अडथळा निर्माण करू नये. ब्लास्टींग बंद करून आमच्या गावाचे पुनर्वसन करण्यात यावे या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. गावातील शाळेच्या इमारतीला ब्लास्टींगमुळे तडे गेलेले असून शाळेतील विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे. ब्लास्टींगमुळे शाळेतील स्लॅब कोसळून त्याखाली विद्यार्थी दबली तर त्याची जबाबदारी कोण घेणार कंपनी किंवा जिल्हा प्रशासन याचे उत्तर देण्यात यावे. कंपनीने स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करायला पाहिजे. बरांज मोकासा गावाचे पुनर्वसन करून त्यांचा योग्य तो मोबदला दिला पाहिजे. कंपनीने पात्र-अपात्रतेच्या विवादामध्ये न पडता सर्वांना सरसकट मोबदला देऊन पुनर्वसन करावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३०) <u>श्री. प्रफुल चटकी, नगराध्यक्ष, भद्रावती नगर परिषद, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कर्नाटक एम्टा मागील काही वर्षांपासून कोळशाचे उत्खनन करत आहे. परंतु कंपनी काही काम बेकायदेशीररीत्या करत आहे. कंपनीच्या परिसरालगत देशाला दारूगोळा पूरविणारी ऑर्डनन्स फॅक्ट्री कार्यरत आहे. कंपनीने ऑर्डनन्स फॅक्ट्रीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. ऑर्डनन्स फॅक्ट्रीच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय कंपनी उत्खनन करू शकणार नाही. पर्यावरणीय मंजूरी देत असताना कंपनीकडून ऑर्डनन्स फॅक्ट्रीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. कोंढा गावातून कंपनीकडून होणाऱ्या वाहतूकीमुळे परिसरातील | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | रस्त्याच्याकडेला असणाऱ्या शेतीच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. त्याकरिता कंपनीतर्फे कोणत्याही प्रकारची नूकसान भरपाई देण्यात येत नाही. KPCL चे शासनाचे कोणते अधिकारी या जनसुनावणीला उपस्थित आहेत याची माहिती देण्यात यावी. कर्नाटक शासनाला येथे काय चालु आहे याची माहिती आहे काय? या ठिकाणी नेमलेल्या एम्टा कंपनीच्या माध्यमातून कर्नाटक शासनाला अंधारात ठेवून बरेच बेकायदेशीर काम सुरू आहेत. कर्नाटक शासनाचे प्रतिनिधी गावकऱ्यांशी संपर्क साधत नाहीत व या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न एम्टा कंपनीमुळे उद्भवतो. कर्नाटक शासनाचा एकही अधिकारी या ठिकाणी उपस्थित राहत नाही व गावकऱ्यांच्या समस्या सोडवण्यात स्वारस्य दाखवत नाही. चिचोर्डी हे गाव भद्रावती नगर परिषदेच्या हद्दीत येत असून त्याठिकाणी कंपनीने कोणत्याच सुविधा पूरविलेल्या नाहीत. तसेच सीएसआर निधी चिचोर्डी, भद्रावती शहर किंवा परिसरातील प्रकल्पग्रस्त गावांमध्ये देण्यात येत नाही. मागील २० वर्षांपासून कंपनी या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. कंपनीने सीएसआर अंतर्गत रू. ६०.० लक्ष जिल्हाधिकारी कार्यालय,चंद्रपूर येथे जमा केले आहे. परंतु आमच्या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण असून चंद्रपूर जिल्हा देशात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात प्रदूषित जिल्हा आहे. प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना व त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल आणि नफा कंपनी कमावणार असे या पुढे होणार नाही. कंपनीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. परंतु कंपनीने भद्रावती तालुक्यात एक मल्टीस्पेशालिटी दवाखाना देखील उभारलेला नाही. खाणीतून निघणाऱ्या पाण्यावर कंपनीने प्रक्रियाकरून भद्रावती नगर परिषदेअंतर्गत येणाऱ्या कोंढा नाल्याद्वारे सोडायला पाहिजे. कंपनीच्या अधिकाऱ्यांना सदर पाण्याचे नमूने देखील देण्यात आले. वास्तवित पाहता कंपनीने कोंढा नाल्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (STP) उभारून शुद्ध पाणी सोडले पाहिजे. परंतु कंपनीद्वारे पाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रकिया करण्यात येत नसून नाल्याद्वारे सदर पाणी वर्धा नदीमध्ये मिसळते. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करण्यात आली आहे. स्थानिक नागरीक त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता कंपनीसोबत | |

| | | |
|---|---|---|
| | संपर्क साधला असता कंपनीतर्फे स्थानिकांवर पोलिस प्रशासनाकडून दबाव टाकून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातात. हे कुठेतरी थांबले पाहिजे. कंपनीला पर्यावरणीय मंजूरी देत असताना परिसरातील सर्व ग्रामपंचायतींना शासनाने विश्वासात घ्यावे. परिसरातील नागरीकांच्या समस्या सोडविल्यानंतरच सदर विस्तारीकरणाला मंजूरी द्यावी ही विनंती. | |

## ३१) श्री. साहिल टोंगे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाणीच्या पाण्याचे नमूने मी तपासले होते. त्यामध्ये बरेच घटक विहीत मर्यादेपेक्षा अधिक आढळले. कंपनीला वाढीव जागा उत्खननासाठी मिळाली व त्यातून निघणाऱ्या खाणपाण्यामध्ये बऱ्याच जनावरांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. वन क्षेत्रामध्ये उत्खनन सुरू असल्याने परिसरातील जंगली प्राणी जसे की वाघ हे नागरी वसतीकडे वळत असून त्यामुळे जनावरांना व गावकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. कंपनीने खाणीतुन निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करण्याकरिता औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसवावी जेणेकरून नाल्याच्या काठावर असलेल्या शेतकऱ्यांना सिंचनाकरिता शुद्ध पाणी उपलब्ध होऊ शकणार. ब्लास्टींगचे काम कंपनीने एका ठेकेदाराला दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. ब्लास्टींगचे काम कुणालाही देता येऊ शकते काय. त्याचे नियम काय आहेत याची माहिती देण्यात यावी. ब्लास्टींग करताना ६ मीटरच्या खड्डयामध्ये ३० कि.ग्रॅम ब्लास्टींग मटेरियल टाकल्यानंतर त्याचा किती परिणाम होतो ते कंपनी पाहू शकते. गावाचे अंतर खूप कमी आहे. या ठिकाणी दररोज जवळपास १०० वेळा ब्लास्टींग करण्यात येते. कंपनी प्रशासनाने कधी गावात येऊन गावकऱ्यांशी संपर्क साधला काय. कंपनी चालु होण्याअगोदरपासून गाव वसलेली आहेत. ब्लास्टींगमुळे गावातील नागरीकांचे किती नूकसान होत आहे याकडे कंपनीने लक्ष दिले पाहिजे. रोजगाराकरिता कंपनीकडे २ दिवसांपूर्वी अर्ज देण्यात आला असून त्यावर कार्यवाही न झाल्यास गावकऱ्यांतर्फे खाण बंद करण्यात येईल. याची दखल घेऊन कंपनीने तोडगा काढावा ही विनंती. वाघाने | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | एका गायीचा बळी घेतला. एका वाघाचा व एका हरणाचा मृत्यू झाला आहे. ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या खड्ड्यात किती स्फोटक साहित्य भरले जाते? दररोज सुमारे १०० वेळा ब्लास्टिंग करण्यात येते. ब्लास्टिंगची ठिकाणे गावांच्या अत्यंत जवळ आहेत. | |

## ३२) श्री. सुनिल नामोजवार, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी महत्त्वाचे मुद्दे असतानासुद्धा ही जनसुनावणी आयोजित का करण्यात आली याचे उत्तर जिल्हा प्रशासनाकडून अपेक्षित आहे. ज्यावेळी खाणपट्टा आवंटीत करण्यात आला त्यावेळी या कंपनीला काही अटी व शर्ती देण्यात आल्या होत्या. त्या कुठल्याही अटींची पूर्तता या कंपनीकडून करण्यात आलेली नाही. कर्नाटक एम्टा कडून पुनर्वसन करारमाना वर्ष २०१३ मध्ये केले तेव्हा कट ऑफ डेट वर्ष २०११ चे ठेवले होते जेव्हा की KPCL कडून नवीन करारनामा वर्ष २०१६ मध्ये केले तर कट ऑफ डेट वर्ष २०११ चे कोणत्या आधारे करण्यात आले? ज्यामुळे ४५० पेक्षा जास्त लोकांना अपात्र घोषित केले आहे. याच विवरण स्पष्ट करण्यात यावे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानूसार ही खाण पूर्णपणे रद्द करण्यात आली होती. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानूसार ही खाण पुन्हा चालु करण्यात आली होती. जेव्हा नव्याने खाण चालु करण्यात आली त्यावेळी सर्व नियम नव्याने लावायला पाहिजे होते. मला सांगण्यात यावे की असा कोणता नियम आहे की महाराष्ट्रात राहणारा माणून कर्नाटक मध्ये मालमत्ता खरेदी करू शकत नाही. पूर्वी काश्मीर व अरुणाचलप्रदेश या दोन राज्यात इतर राज्यातील व्यक्ति मालमत्ता खरेदी करू शकत नव्हता परंतु आता त्यामध्ये देखील बदल करण्यात आला आहे. आज देशातील नागरीक कोणत्याही ठिकाणी मालमत्ता खरेदी करू शकतो. चंद्रपूरच्या व्यक्तिने भद्रावतीमध्ये मालमत्ता खरेदी केली असेल तर तो अपात्र कसा याबाबत उत्तर देण्यात यावे. ग्रामपंचायतीच्या यादीप्रमाणे सर्व नागरीकांना कंपनीने पात्र करायला पाहिजे होते. कंपनीने काही लोकांना हाताशी धरून पात्र आणि अपात्रतेचा खेळ सुरू केला आहे जो खेदजनक व गावकऱ्यांवर अन्याय | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | करणारा विषय आहे. जोपर्यंत गावाचे पूर्णपणे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत त्या जागेचा निस्तार हक्क कमी करता येत नाही. मागील १५-२० वर्षांपासून गावाच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू असून देखील कंपनी गावाचे पुनर्वसन करू शकलेली नाही. कंपनीचे खाणकाम व कोळसा उत्खनन व वाहतूक वर्ष २०२१-२२ मध्ये सुरू झाले. तेव्हापासून सदर कंपनीकडून होत असलेल्या प्रदूषण नियमांचे उल्लंघन प्रकरणी स्थानिक पर्यावरण विषयक संघटनांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी केल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरवर्षी २०२२, २०२३ व २०२४ असे ३ आर्थिक वर्षात कंपनीचे अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. परंतु गुन्हा दाखन करण्यात आले नाही. याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उत्तर देण्यात यावे. कंपनीचे काम व वाहतूकीमुळे कोंढा नाला जलप्रदूषित होऊन ते पुढे पैनगंगा नदी पात्रात प्रदूषित पाणी मिसळून नदी प्रदूषित होत असताना कंपनीने व प्रदूषण नियंत्रण मंडळ चंद्रपू रने यावर कोणती उपाययोजना केल्या आहेत. आज जनसुनावणी असल्याने खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून रस्ता दुरूस्त करण्यात आला परंतु दररोज असे होत नाही. गावातील स्थानिका नागरीकांना दररोज धुळीचा सामना करावा लागत असून त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे व वायु प्रदूषणाची समस्या उद्भवत आहे. याबाबत देखील वारंवार तक्रारी करण्यात आल्या असून त्याचे उत्तर देण्यात यावे. या ठिकाणी झाडे लावलेली आहेत. झाडे लावण्याबाबत नियमावली देण्यात आली आहे. झाडे कोणत्या पद्धतीने लावली पाहिजे व कोणत्या प्रजातीची झाडे लावली पाहिजे याबाबत नियमावली आहे. कंपनीने पर्यावरणाशी संबंधित कुठलेही कार्य केलेले नाही. त्यामुळे सदर जनसुनावणी ही तात्काळ रद्द करण्याची घोषणा या ठिकाणी करण्यात यावी. जोपर्यंत कंपनीतर्फे पर्यावरणावर होणारा ऱ्हास नियंत्रणात करण्यात येत नाही तोपर्यंत त्यांच्या विस्तारीकरण प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये. कंपनीची अनामत रक्कम केली असली तरी कंपनीवर गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. | |

३३) सौ. छाया श्यामराव आमणे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावामध्ये मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण होत आहे. त्यामुळे आम्हाला त्रास होत आहे. तसेच रस्त्यांची दुरावस्था झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. धान्य, कपडे कसे वाळवायचे याचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्यामुळे कंपनीला विनंती आहे की, कोंढा गावातून सुरू असलेली वाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३४) सौ. सोनाली महेश मोरे, ग्रामपंचायत सदस्य, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. कोंढा गावातून वाहतूक चालु देणार नाही. वाहतूकीचा सर्वात जास्त त्रास कोंढा गावाला होत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३५) सौ. वैशाली काळे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. कोंढा गावातून वाहतूक चालु देणार नाही. वाहतूकीचा सर्वात जास्त त्रास कोंढा गावाला होत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३६) सौ. वैशाली वाडपणे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कंपनीला पर्यावरणाबद्दल काहीच कळलेले नाही. कंपनी प्रशासनाने एक दिवस आमच्या गावामध्ये वास्तव्यास राहावे. धुळीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांच्या आरोग्याच्या समस्या होत असून लहान मुलांना देखील धुळीचा त्रास होत आहे. कोंढा गावातून कंपनीला | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कोणत्याही प्रकारचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. कोंढा गावातून वाहतूक चालु देणार नाही. वाहतूकीचा सर्वात जास्त त्रास कोंढा गावाला होत आहे. | |

## ३७) सौ. बेबीताई निखाडे, प्रकल्पग्रस्त, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाणीचे विस्तारीकरण होत असल्याची बाब आमच्या लक्षात आली असून आम्ही विस्तारीकरण होऊ देणार नाही. कंपनीने गावातील जमीनी अधिग्रहीत केलेल्या आहेत. तसेच कंपनीने प्रकल्पग्रस्तांना पूर्णपणे रोजगार दिलेला नाही. कंपनीने ग्रामपंचायतीवर दबाव आणून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊ नये. आमच्या गावाचे पूर्णत: पुनर्वसन झाल्याशिवाय आम्ही फेरफार होऊ देणार नाही. मा. श्री. अहीर साहेबांनी सन २००७ मध्ये जमीन घेतली तेव्हा आम्हाला सांगण्यात आले होते की आमच्या जमीनीचे अर्धे पैसे आम्हाला परत मिळतील. कंपनीच्या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयात विचारणा केली असता उत्खनन पूर्ण झाल्यानंतर जमीनी परत मिळणार आहेत. गावालगतच्या परिसरात वाघाचे अस्तित्व आहे. त्यामुळे जनावरांना चारा घालणे कठीण झाले आहे. जनावरांना वाघाचा धोका निर्माण झालेला आहे. जोपर्यंत गावाचे पूर्णत: पुनर्वसन होत नाही तोपर्यंत खाणीचे विस्तारीकरण होऊ देणार नाही. आंदोलन करू व तुमची कंपनी बंद करू. गावातील २१० लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. स्थानिकांना कंपनीने रोजगार दिलेला नाही. फक्त ४० लोकांना रोजगार दिला. तसेच पाठपुरावा करून आम्ही आमच्या मुलांना रोजगार मिळवून देत आहोत. रोजगार दिलेल्या युवकांना फक्त ११०००/- रूपये मासिक वेतन देण्यात येत आहे. आज महागाई प्रचंड प्रमाणात वाढलेली असताना तुटपुंज्या पगारात उदर्निर्वाह करायचा कसा हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतीचे दर काय आहे याबाबत जिल्हा प्रशासनाला कल्पना आहे. दुसऱ्या ठिकाणी जमीन विकत घेणे अशक्य आहे. माझी ग्रामपंचायतीला विनंती आहे की | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | फेरफार होऊ देऊ नका व ग्रामस्थांवर अन्याय होऊ देऊ नका. | |

## ३८) श्रीमती मंगला बबन रणदिवे, प्रकल्पग्रस्त, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी १५ वर्षांपासून गावामध्ये वास्तव्यास आहे. परंतु कंपनीकडून माझ्या जागेचा अर्धा मोबदला देखील मिळालेला नाही. कंपनी मोबदला देण्यास टाळाटाळ करत आहे. आम्ही या कंपनीविरोधात वेळोवेळी आंदोलने केली व त्यामुळे आम्हाला कारागृहात जावे लागले. परंतु कंपनीने आमच्या मुलांना केवळ रू. २५००/- मासिक पगारावर कामावर घेतले. कंपनीच्या प्रदूषणामुळे स्थानिकांना घशाच्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. तसेच ब्लास्टींगमुळे माझ्या घराचे नूकसान झालेले आहे. मी याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल केली परंतु कंपनीने माझी विचारपूस देखील केलेली नाही. कंपनी स्थानिकांना रोजगार देण्यास टाळाटाळ करत आहे. गावामध्ये बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कंपनी स्थानिकांना वगळून बाहेरच्या नागरीकांना नौकऱ्या देत आहे. प्रशासनाने ब्लास्टींगमुळे माझे घर पडल्यानंतर कंपनीने काय कार्यवाही याबाबत कंपनीला विचारणा करावी. कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्खनन करू नये. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ३९) श्री. बाबा ठावरी, धुळग्रस्त, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमदार कधीही जनतेसाठी आंदोलन करत नसून स्वत:साठी आंदोलन करतात. आज जनसुनावणी असल्यामुळे कोंढा गावाचा रस्ता साफ करण्यात आला आहे. यापूर्वी या रस्त्याची साफसफाई करण्यात आली नाही. ट्रक थांबल्यामुळे अपघात होतात असे कंपनीचे म्हणणे आहे. पोलिसांकडे तक्रार केली असता आम्ही फक्त वाहतूक सुरळीत करणासाठी आले असल्याचे सांगितले जाते. कंपनीने माझ्या मुलाला नौकरी देण्याची आश्वासन दिले होते परंतु ते आजपर्यंत पूर्ण केले नाही. गावाच्या सरपंचांना विनंती आहे की कंपनीला ना-हरकत | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. रस्त्यावर कंपनीच्या वाहनांची संख्या वाढल्यास नागरीकांना रस्त्याने वाहतूक करणे अशक्य होईल. वाहतूकीमुळे रस्त्यावर धुळीचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. खाण बंद असताना रस्त्याची दुरावस्था झाली नव्हती. कंपनीने खाणी चालु केल्यानंतर कोंढा वासीयांना कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या या बाबत माहिती देण्यात यावी. इतर प्रकल्पांमध्ये गाव दत्तक घेऊन सर्व सुविधा उपलब्ध होतात. परंतु आम्हाला फक्त धुळ मिळते. कंपनीने स्थानिकांना नौकऱ्या दिल्या पाहिजे. बाहेरच्या व्यक्तिंना कंपनीने नौकरी देऊ नये. | |

**४०) श्रीमती कमल बंडु बावने, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावामध्ये धुळीचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून लहान मुलांना विविध प्रकारच्या आजाराची लागण होत आहे. त्यांच्या उपचारामध्ये आमचा वेळ व पैसा दोन्ही वाया जात आहे. काही दिवसांपूर्वी आमच्या गावातील एका स्त्रीचा अपघात झाला होता. त्यावेळी कंपनीने मोबदल्याची रक्कम दिलेली नाही. कंपनीने कोंढा गावातून होणारी वाहतूक बंद करावी. कंपनीने पर्यायी मार्गाचा शोध लावून त्या मार्गावर वाहतूक करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**४१) श्रीमती सुरेखा अमोल डोंगे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावात धुळीचा खुप त्रास असून घरातील काना कोपऱ्यात धुळ साचलेली असते. माझा लहान मुलगा देखील धुळीच्या प्रदूषणामुळे सतत आजारी पडलेला असतो. यावर उपाय काय याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. कंपनीने स्थानिकांकरिता दवाखाना देखील उपलब्ध करून दिलेला नाही. कोळशाच्या वाहतूकीमुळे रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडलेले असून अपघात होण्याची भिती असते. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

४२) **श्री. पुरूषोत्तम दुपारे, चिचोर्डी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मौजा चिचोर्डी हे गाव भद्रावती नगर परिषदेमध्ये समाविष्ट आहे. मी वारंवार श्री. आर.पी.सिंग साहेबांसोबत भ्रमणध्वनीद्वारे संपर्कात असतो. आज ते जनसुनावणीदरम्यान उपस्थित असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर अधिकारी मागील १५ वर्षांपासून फक्त आश्वासन देत असून प्रत्यक्षात आश्वासनांची पूर्तता करत नाही. मौजा चिचोर्डी येथील महामार्ग कंपनीमार्फत बंद करण्यात आला आहे. सदर रोड बंद करायला हा काय कंपनीच्या मालकीचा आहे का? मी मुळचा चिचोर्डी गावाचा रहिवाशी असून मला चिचोर्डी गावाचा रहिवासी नसल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. मुळात कंपनीचे अधिकारी स्थानिका रहिवासी नाहीत. कंपनीने प्रकल्पग्रस्तांच्या समस्या समजून घ्यायला हव्या. कंपनीला उद्योग चालवायचा असल्याने आमचा विरोध नाही. त्याबाबत आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत परंतु कंपनीने सर्वप्रथम स्थानिक नागरीकांच्या समस्या मार्गी लावाव्या. जोपर्यंत गावाचे पुर्णत: पुनर्वसन होत नाही तोपर्यंत आमचा निस्तार हक्क अबाधित राहतो. आमच्या गावाचे पुनर्वसन आपण करत नाही व आमच्या निस्तार हक्काची जमीन कंपनी का घेत नाही याचे उत्तर देण्यात यावे. आम्हा मागील १५ वर्षांपासून ऐकत आहोत. आमची ऐकण्याची व समजण्याची सहनशीलता संपलेली आहे. कंपनीने रस्ता बंद केल्यामुळे स्थानिकांना पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. चिचोर्डी गावातील सर्व समस्यांचे जोपर्यंत कंपनीतर्फे निराकरण करण्यात येत नाही तोपर्यंत उपस्थित अधिकाऱ्यांना विनंती आहे की कंपनीला पर्यावरणीय मंजूरी देण्यात येऊ नये. आमचा प्रकल्पाला विरोध नाही. परंतु आमचे घर मोडकळीस आले असल्याने आमच्या समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे. ब्लास्टींगमुळे घराला तडे जात असून आमच्या मुलांचे जगणे कठीण झाले आहे. मौजा चिचोर्डी मध्ये अवार्डसाठी २५ टक्के रक्कम भरावयाची होती. अवार्डच्या बाबतीमध्ये चव्हाण साहेबांनी सर्व गोष्टी हाताळलया होत्या. त्यावेळी कंपनीने ती २५ टक्के रक्कम भरली नाही व त्यामुळे आमच्या चिचोर्डी गावाचे पुनर्वसन थांबविण्यात आले. त्यामागची | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण आपले मद्दे उपस्थित करावे. कंपनीतर्फे जनसुनावणीच्या शेवटी उपस्थित सर्व प्रश्नांची उत्तरे घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | कारणे कंपनीने सांगावी. त्या काळात कंपनीने २५टक्के रक्कम भरली असती तर आमच्या चिचोर्डी गावाच्या पुनर्वसनाला मान्यता मिळाली असती. कंपनीला वन विभागाची १५० एकर जमीन मिळाली असल्याने कंपनीने गावांना त्यागले आहे. वन जमीनीची उत्खननाची मर्यादा संपल्यामुळे आता परत कंपनीला परिसरातील गावांच्या जमीनीची गरज असल्याने कंपनी गावकऱ्यांकडून अपेक्षा करत आहे की त्यांनी कंपनीला सहाकर्य करावे. कंपनीने स्थानिकांवर अत्याचार करू नये. कंपनीने चिचोर्डी गावाचे पुनर्वसन करून गावकऱ्यांचा समस्या सोडवाव्या तरच कंपनीला चिचोर्डी गावातील नागरीकांचे सहकार्य मिळणार आहे. कंपनीच्या वागणूकीमुळे गावकऱ्यांना विरोध करावा लागत आहे. कंपनीने थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून जमीन खरेदी केलेली आहे. कंपनीने मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की तुम्ही कोंढा, किलोनी, कढोली या गावांमधून कन्व्हेअर बेल्टद्वारे माजरी रेल्वे सायडींगपर्यंत कोळशाची वाहतूक करणार आहात. परंतु कन्वहेअर बेल्टचे काम सुरू झालेले नाही. | |

यानंतर स्थानिकांनी जनसुनावणी दरम्यान गदारोळ केला. तद्नंतर मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी कंपनी प्रशासनाला उतर देण्याचे आदेश दिले. परंतु गदारोळ सुरू राहीला. त्यानंतर पोलिस प्रशासनातर्फे स्थानिकांना शांत बसण्याचे आवाहन करण्यात आले.

### ४३) श्रीमती शिल्पा अधिराज, मुख्य अभियंता, कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि.:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | आपल्या समस्यांची नोंद घेण्यात आली आहे. आपल्या समस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न कंपनीकडून करण्यात येईल. आमच्या वतीने पर्यावरण सल्लागार आपल्या प्रश्नांची उत्तरे देतील. |

### ४४) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीतर्फे केपीसीएलचे मुख्य अभियंता यांचेकडून उत्तरे अपेक्षित आहेत. कंपनीने कंत्राट दिलेल्या कंपनीकडून उत्तरे अपेक्षित नाही. कोंढा गावामध्ये मागे अपघात होऊन एका व्यक्तिचा मृत्यू झाला होता. त्याकरिता कंपनीने रू. १५.० लाख रूपयांची नूकसान भरपाई देणे अपेक्षित होते | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आमचे कार्यालय येथे कार्यरत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | परंतु कंपनीने फक्त २.० लाख रूपये दिले. कायदा व सुव्यवस्थेच्या नावावर कंपनी पोलिस प्रशासनाला हाताशी घेऊन दबावतंत्राचा वापर करतात. सदर कोळसा खाणीतून कितीतरी कोळशाच्या वाहनांची चोरी करण्यात येते व कोळसा बाहेर विकण्यात येतो. आपण कंपनीचे मुख्य नियोक्ता असल्याने उत्तरे आपल्याकडून अपेक्षित आहेत. मुख्य नियोक्त्याने कंत्राटदारावर लक्ष ठेवले पाहिजे. कंपनीने उद्योगामध्ये आजपर्यंत औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली नाही. पर्यावरण जनसुनावणी असल्याने कंपनीने फक्त २-३ टाक्या तयार करून ठेवल्या. खाणीचे प्रदूषित पाणी कोंढा नाल्यामध्ये सोडल्यामुळे कितीतरी जनावरांचा या परिसरात मृत्यू झालेला आहे. त्याची जबाबदारी कोण घेणार? तसेच कंपनीने वन जमीन अधिग्रहीत केली व तेथे मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांचा जमीनीत पूरले. कंपनीने भारत सरकारच्या कायद्यानूसार कामारांना किमान वेतन दिले नाही. राज्य सरकारच्या नियमांनूसार कंपनी कामगारांना वेतन देत आहे. त्यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. कंपनीने बिहार राज्याच्या व्यक्तिला कंपनीमध्ये नौकरी दिली त्यावेळी माझे कंपनी प्रशासनासोबत वाद झाला होता तेव्हा कंपनी प्रशासनाने सांगितले की त्या कामगाराच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी तसेच राज्य कर्मचारी विमा आयोगाचे शुल्क कपात करण्यात येत नाही. याबाबत माझ्यावर ३५३ कमल अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कर्मचाऱ्याला खाणीमध्ये काही कमी जास्त झाले तर त्याची नूकसान भरपाई कशा पद्धतीने देता याबाबत माहिती देण्यात यावी. कंपनीने भारत सरकारच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे. कंपनीचे कंत्राटदार कंपनीच्या पाठीमागे कोळसा चोरी करते. याबाबत टीव्ही९ या वृत्तवाहिनीवर बातमी प्रकाशित करण्यात आली होती. इतक्या वर्षांपासून कंपनी कार्यरत असून देखील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कंपनीने केलेले नाही. कंपनीने सीएसआर मार्फत प्रकल्पग्रस्त गावांमध्ये विकासकामे करणे गरजेचे असून देखील कंपनीने याबाबत कोणतीही उपाययोजना केलेली नाही. कंपनीने किती सीएसआर निधी वाटप केला याबाबत माहिती देण्यात यावी. याबाबत वेळोवेळी माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती मागविण्यात आली तरी त्याचे उत्तर आजपर्यंत मिळालेले | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी जनतेला कंपनीचे म्हणणे ऐकण्याची विनंती केली.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे समस्येप्रमाणे आमच्या पर्यावरण सल्लागार यांचेकडून देण्यात येईल. कृपया ते शांतपणे ऐकून घ्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | नाही. कंपनीने सर्व प्रथम अस्तित्वात असलेल्या पर्यावरणीय मंजूरीच्या अटी व शर्तीचे पालन केल्याशिवाय भद्रावती नगर परिषद व परिसरातील प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींकडून आपणांस ना-हरकत प्रमाणपत्र मिळणार नाही. कंपनीने कंत्राटदारास हटवावे व स्वत: येथे उपस्थित राहावे. ब्लास्टींगमुळे शाळेची छत कोसळली. नियमानूसार ब्लास्टींगसाठी दारूगोळा साठवण्याचे ठिकाण गावापासून किमान ८ किलोमीटर अंतरावर असणे आवश्यक आहे. गावामध्ये काही दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण राहणार? कंपनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेचा हप्ता कपात करण्यात येत नसेल तर कर्मचाऱ्याला काही दुखापत झाल्या त्याची जबाबदारी कोण घेणार? कंपनीने कंत्राट देत असताना कंत्राटदाराची सर्व कागदपत्रे पडताळायला पाहिजे व त्यानूसार त्यांचे देयक अदा करण्यात यावे. परवानगीच्या अटींचे पालन झाले आहे का ते तपासले जावे. ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. या खाणीतून कोणताही महसूल मिळत नाही. टायर धुण्याची कोणतीही व्यवस्था नाही. किशोर नावाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला, परंतु कंपनीने केवळ रुपये ४.० लाख भरपाई दिली. आम्ही या प्रकल्पाचा विरोध करीत आहोत. | |

**४५) श्री. पुरूषोत्तम दुपारे, चिचोर्डी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील १५ वर्षांपासून मौजा चिचोर्डी येथील ग्रामस्थांचे मालमत्ता कर थकलेले असून ते भरण्याची जबाबदारी कंपनीने घ्यावी. गावकरी मालमत्ता कर भरणार नाहीत. कंपनीने रुपये ५० लाख निधी देणे व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे अपेक्षित होते, परंतु मजुरांना केवळ रुपये १०,०००/- दिले गेले. ही खाण तात्काळ बंद करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांनी प्रदूषण, आरोग्य समस्या, पुनर्वसन, वाहतूक, कोढा नाल्याचे प्रदूषण, रोजगाराबाबत मुद्दे उपस्थित केले असून त्याबाबत आमची उत्तरे शांतपणे ऐकून घ्यावी व त्यानंतर पुढील चर्चा करण्यात येईल. |

४६) **श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने सर्वप्रथम प्रदूषणाविषयक केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी. त्यानंतर सीएसआर अंतर्गत केलेल्या कामांची माहिती द्यावी. बाहेरील व्यक्तींना ड्रायव्हर, मजुर इत्यादी नोकऱ्या दिल्या जात आहेत. कंपनी समस्या सोडवित नाही. आजपर्यंत कोणतीही पुनर्वसन व्यवस्था करण्यात आलेली नाही. ही खाण तात्काळ बंद करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे समस्येप्रमाणे आमच्या पर्यावरण सल्लागार यांचेकडून देण्यात येईल. कृपया ते शांतपणे ऐकून घ्यावे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी जनतेला कंपनीचे म्हणणे ऐकण्याची विनंती केली. कंपनीचे मालक, कंत्राटदार व पर्यावरण सल्लागार हे सर्व उपस्थित मुद्यांची उत्तरे देऊ शकतात. |

४७) **श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी महोदयांना विनंती आहे की सदर जनसुनावणी कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिमीटेड या कंपनीची आहे किंवा एम्टा कंपनीची आहे हे स्पष्ट करावे. कंपनीने एम्टा कंपनीच्या प्रतिनिधींचे जनसुनावणीमध्ये उपस्थित मुद्यांचे उत्तर देण्यासाठी लेखी नामनिर्देशन जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. जर कंपनीने एम्टा कंपनीच्या अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन केले असेल तर आम्ही एम्टा कंपनीकडून उत्तर ऐकण्यास तयार आहोत अन्यथा नाही. मागील १५ वर्षांपासून कंपनीविरोधात लढा देत आहोत परंतु आजपर्यंत केपीसीएल कंपनीचा एकही अधिकारी या भागामध्ये दिसला नाही. आज जनसुनावणी असल्यामुळे केपीसीएलचे अधिकारी येथे उपस्थित झाले आहेत. सर्वप्रथम श्री. आर.पी.सिंग व श्री. जिभकाटे यांच्या विरोधात बेकायदेशीररीत्या जनसुनावणी व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न केला असल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला पाहिजे. काल कंपनीच्या अधिकाऱ्यांनी | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, जनसुनावणी घेणे म्हणजे प्रकल्पाला परवानगी देणे असे नाही. जनसुनावणीचा उद्देश हा प्रकल्पाविषयी स्थानिकांचे मत घेणे असे आहे. जनसुनावणी दरम्यान उपस्थित मुद्यांची नोंद घेऊन त्याची इतिवृत्त शासनाकडे कुठलाही बदल न करता सादर केले जातात. जनसुनावणीदरम्यान प्रकल्प प्रवर्तकांकडून काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नाहीत तरी प्रकल्प प्रवर्तकांना त्याबाबतची उत्तरे पर्यावरण मुल्यांकन समितीपुढे सादर करावी लागतात. त्याशिवाय प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण विषयक मंजूरी मिळत नाही.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी कंपनीला जिल्हा खनिज |

| | | |
|---|---|---|
| | माझ्यासोबत भ्रणध्वनीद्वारे संपर्क साधून जनसुनावणीमध्ये प्रकल्पास विरोध न करण्याबाबत विनंती केली व त्या बदल्यात तुम्हाला पाहिजे ते करू असे बेकायदेशीरपणे आश्वासन दिले. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सदर जनसुनावणी मॅनेज करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. कंपनीने सदर जनसुनावणी बेकायदेशीरपणे चालवण्याचा प्रयत्न केला आहे. आजपर्यंत कर्नाटक पॉवर कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या सूचनांचे पूर्णपणे पालन कंपनीने केले आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच यापूर्वी देण्यात आलेल्या पर्यावरण मंजूरीच्या सर्व अटी व शर्तींचे पूर्णपणे अनुपालन करण्यात आले आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/११/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली होती. मा. जिल्हाधिकारी यांनी प्रदूषणामुळे नूकसान झाल्यास कंपनीवर दंड आकारण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. माझ्या घरासमोरून दररोज कोळशाची वाहतूक होते परंतु एकाही वाहनावर ताडपत्रीचे आच्छादन करण्यात येत नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनूसार कंपनीमध्ये टायर धुण्याची व्यवस्था असायला हवी परंतु कंपनीने आजपर्यंत टायर धुण्याची यंत्रणा उभारलेली नाही. उप-प्रादेशिक अधिकारी जर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची ओपली दाखवत असतील तर सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण कसे होत असेल याबाबत शंका उपस्थित होत आहे. आपणांस विनंती आहे की, आजची जनसुनावणी रद्द करण्यात यावी व कंपनीने केलेल्या अनुपालनाविषयी स्थानिक नागरीकांच्या समितीला जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व कंपनी प्रशासन यांनी दाखवावे व त्यानंतरच जनसुनावणी घेण्यात यावी. यासाठी ७ दिवसांचा कालावधी घेण्यात यावा. येथे उपस्थित अधिकारी फक्त बघ्याची भूमिका घेतात व नोंद घेण्यात येत असल्याचे सांगतात. परंतु सदर व्हिडीओ रेकॉर्डीगमधील काही भाग कापून त्याचे ईतिवृत्त तयार करण्यात येतात. असाच अनुभव आम्हाला मे. अरविंदो या खाणीच्या जनसुनावणीदरम्यान आला. मी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे १४ निवेदने दिली व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे १७ निवेदने दिली तरी त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. मे. अरविंदो प्रकल्पाच्या | प्रतिष्ठानमध्ये खनिज निधी जमा करण्यात येतो किंवा कसे याबाबत विचारणा केली. |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणी दरम्यान असाच प्रकार घडला होता. जनसुनावणीमध्ये आमच्या विरोधाचा उल्लेख त्या अहवालात नव्हता. त्या जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये माझ्या प्रश्नाचा उल्लेख नव्हता. माझ्या ग्रामपंचायतीमध्ये सदर अहवाल उपलब्ध आहे. तरी प्रदूषण नियंत्रण मंडळ केपीसीएल सारख्या भ्रष्ट कंपनीची जनसुनावणी आयोजित करते. कंपनीच्या वसाहतीमध्ये एकही मराठी माणूस वास्तव्यास नाही. कंपनी स्थानिकांना रू. १२०००/- च्या मासिक वेतनानूसार काम देत आहे जेव्हा की मी माझ्या शेतातील कामगारांना रू. १५०००/- च्या मासिक वेतनानूसार काम देत आहे. तसेच आमची शेती घेऊन देखील कंपनी आम्हाला कमी पगाराचा रोजगार देत आहे. माहितीच्या अधिकाराअंतर्गत मी माहिती मागितल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाला या प्रकल्पातून एकही रूपयाचा महसूल मिळत नाही. मे. अरविंदोच्या खाणीतून शासनाला ३३ टक्के रॉयल्टी मिळते. केपीसीएस कंपनीकडून त्याप्रकारची रॉयल्टी महाराष्ट्र शासनाला मिळत नाही. या कंपनीमुळे माझ्या क्षेत्रात एकही रूपयाचा फायदा झालेला नाही. कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल झाला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार. माझ्या गावाचा कृष्णा कर्णुजी देठे हा मुलगा मृत्यूमुखी पडला तर त्याच्या मोबदल्यात कंपनीचे अधिकारी रू ४.० लाख घेऊन आले होते. त्यामुळे सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

**४८) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अशाच प्रकारची जनसुनावणी मे. अरविंदो या कंपनीची घेण्यात आली होती. सदर जनसुनावणीमध्ये देखील स्थानिकांनी प्रकल्पाला विरोध दर्शविला होता. तरी त्या अरविंदो कंपनीला शासनाने प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र दिले. त्या जनसुनावणी मध्ये देखील स्थानिक शेतकऱ्यांनी शेतीच्या दराबाबत आक्षेप नोंदविला होता. कोंढा फाट्यापासून कोंढा गावापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेती आहे. मे. जीएमआर कंपनी त्यांच्या प्रदूषणामुळे ज्या शेतकऱ्यांच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे समस्येप्रमाणे आमच्या पर्यावरण सल्लागार यांचेकडून देण्यात येईल. कृपया ते शांतपणे ऐकून घ्यावे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी जनतेला कंपनीचे म्हणणे ऐकण्याची विनंती केली. कंपनीचे मालक, कंत्राटदार व पर्यावरण सल्लागार हे सर्व उपस्थित मुद्यांची उत्तरे |

| | | |
|---|---|---|
| | पिकांचे नूकसान झाले अशा शेतकऱ्यांना रू ८.० लाखप्रमाणे नूकसान भरपाई देत होती. त्याचप्रमाणे या परिसरातील शेतकऱ्यांच्या चना, कापूस व सोयाबीन पिकांचे नूकसान झाल्यामुळे कंपनीने किती प्रमाणात नूकसान भरपाई दिली याची माहिती देण्यात यावी. जिल्हा प्रशासनातर्फे व तहसिलदार कार्यालयातर्फे सर्वेक्षण करण्यात येते किंवा कसे याबाबत साशंकता आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे काम परिसरातील प्रदूषण कमी करणे असून त्यांच्याकडून प्रदूषण नियंत्रण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. आमचे ७-८ निवेदने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात देऊन देखील उद्योगांवर कार्यवाही होत नाही. कर्नाटक शासन या खाणीतून कोळसा उत्खनन करून घेऊन जाते परंतु स्थानिक मराठी माणसाला या फायदा मिळत नाही. कोळस वाहतूक करणारे कंत्राटदार बाहेरून येतात तसेच परराज्यातल्या वाहनचालकांना नौकरी देण्यात येते. परंतु स्थानिक नागरीकांना नौकऱ्या देण्यात येत नाही. एम्टा कंपनीचा मालक आहे किंवा कर्नाटक शासन या कंपनीचे मालक आहेत याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. सदर कंपनीमुळे स्थानिक नागरीकांना कोणता फायदा झाला याचे उत्तर कंपनीने द्यावे. प्रदूषणामुळे स्थानिकांचे नूकसान होत असून त्यामुळे कर्करोगासारखे भीषण आजार नागरीकांना होत आहेत. तसेच हृदयविकार वाढलेला आहे. या सर्व समस्यांचा सामना स्थानिकांना करावा लागत असून त्यांनाच रोजगारातून डावलण्यात येत असल्याचे दिसत आहे. अरविंदो सारख्या कंपन्यांना स्थानिकांचा प्रचंड विरोध असून देखील ना-हरकत प्रमाणपत्र कसे काय मिळते हा सर्वात मोठा प्रश्न आहे. सर्वप्रथम मागील वचनपूर्त्या पूर्ण केल्या जातील, त्यानंतरच विस्तारीकरणाकडे जावे. अशुद्धता असलेला कोळसा उत्खनन केला जात आहे. कंपनीने सध्या नवीन कार्यालय स्थापन केले आहे. | देऊ शकतात. सदर जनसुनावणीचे इतिवृत्त शासनाकडे सादर केले जातात व त्यांना पर्यावरण मंजूरी नवी दिल्ली येथून पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याकडून प्राप्त होते. |

४९) श्री. रविंद्र शिंदे, अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी बरीच आंदोलने झाली. आज येथे जिल्हा प्रशासन स्थानिकांच्या भावना ऐकण्यासाठी आले आहे. शेतकरी व प्रकल्पग्रस्त नागरीक अधिकाऱ्यांन भेटायला त्यांच्या कार्यालयात गेले असता त्यांचा अपामन केला जातो. या ठिकाणी स्थानिक नागरीकांचा प्रकल्पाला विरोध असून देखील सदर प्रकल्पाला मान्यता मिळणार असल्याचे आम्हाला माहिती आहे. त्यामागे कोळशाची ऊर्जा तयार करण्यासाठी गरज हे कारण आहे. या ठिकाणी आज एकही लोकप्रतिनिधी उपस्थित का नाही हा प्रश्न आहे. या ठिकाणी स्थानिकांच्या वेगवेगळ्या समस्या असून कंपनीने समस्यांचे निराकरण केलेले नाही. स्थानिकांनी काही करायचे ठरवले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येतो. जनता रस्त्यावर उतरली तर सदर प्रकल्प चालू शकणार नाही. देशाला कोळशाची गरज आहे. कंपनीला परवानगी द्यावी लागते असे समितीचे उत्तर असणार आहे. कंपनी प्रकल्पग्रस्तांना केव्हा नौकरीवर घेणार याचे उत्तर देण्यात यावे. मागे स्थानिकांनी आंदोलन केले तर स्थानिक प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. कंपनीने उर्वरित जमीन का घेतली नाही याचे उत्तर द्यावे. तसेच परिसराचा विकास देखील केलेला नाही. स्थानिकांना नौकरी देण्यात आली नसून परप्रांतीय नागरीकांना नौकरी देण्यात येते. कंपनीने स्थानिक नागरीकांच्या समस्यांचे प्रथम निराकरण करावे व त्यांनतरच विस्तारीकरण करावे. स्थानिकांना न्याय द्यावा. स्थानिकांचा विकास कंपनीसोबत व्हावा. १ एकरमध्ये जवळपास ४० कोटींच्या कोळशाचे उत्खनन करण्यात येते. आम्ही या प्रकल्पाच्या विरोधात नाही. स्थानिका नागरीकांना शिक्षण व रोजगार उपलब्ध व्हावा. सदर प्रकल्पामुळे स्थानिकांना सर्व प्रकारच्या सुविधा मिळायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या जमीनी प्रकल्पामध्ये गेल्या परंतु त्यांचा विकास झाला नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

५०) <u>श्री. विशाल दुधे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे उपस्थित सर्व नागरीकांनी सदर विस्तारीकरण प्रकल्पास विरोध दर्शविला आहे. स्थानिक नागरीकांच्या विरोधाप्रमाणे प्रदूषण नियंत्रण मंडळाने अहवाल तयार करावा व पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडे सादर करावा. जनसुनावणीदरम्यान व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात येते परंतु सदर व्हिडीओसोबत छेडछाड करून त्यामध्ये जास्त आक्रामक लोकांचे मत वगळून ती कार्यालयात देण्यात येते. त्यानूसार इतिवृत्त तयार करण्यात येतो व शासनास सादर करण्यात येतात. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासन यांच्यापर्यंत सद्य:स्थिती अहवाल पोहचत नाही व प्रकल्पांना मान्यता देण्यात येते. जनसुनावणीदरम्यान छायाचित्रीकरण करण्यात आल्याची प्रत आम्हाला किती दिवसात मिळणार याची माहिती देण्यात यावी. यामध्ये पारदर्शकता कशी येणार आहे याची माहिती देण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पाला परवानगी दिली तर त्या विरोधात मी जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करणार आहे. स्थानिकांचा सदर प्रकल्पास विरोध आहे कारण कंपनीचे वन क्षेत्रामध्ये उत्खनन करणे हे उल्लंघन आहे. तसेच स्थानिकांचे पुनर्वसन मागील १७ वर्षांपासून रखडलेले असून ते देखील नियमांचे उल्लंघन आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारणे दाखवा नोटीसीचे देखील कंपनीने उल्लंघन केले आहे. कंपनीने शासनाच्या नियमांचे वारंवार उल्लंघन केले असताना देखील केंद्र शासन कोणत्या आधारवर या कंपनीला ५.० दशलक्ष टन प्रतिवर्ष उत्पादन करण्यास परवानगी कशी काय देते? राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्र शासनाला या कारणे दाखवा नोटीसची प्रत दिलेली आहे काय? केंद्र शासनाला सदर खाणीने औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा व घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविलेली नाही, टायर वॉशींग सिस्टम नाही, पाण्याचे फवारे कंपनीने परिसरामध्ये बसविलेले नाही इत्यादी उल्लंघनाबाबत अहवाल देण्यात आला आहे काय? तसेच कंपनीने मागील १७ वर्षांपासून वायु प्रदूषण तपासणी यंत्रणा देखील बसविलेली नाही असा अहवाल केंद्र शासनाकडे सादर | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते. |

| | | |
|---|---|---|
| | केलेला आहे का? कंपनीला सन २०२४ मध्ये प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी एकूण ११ अटी व शर्तींचे उल्लंघन असल्याची नोटीस कंपनीला दिली होते. तरी कंपनीला केंद्र शासनातर्फे सन २०२५ मध्ये पर्यावरणीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये कंपनीला एकूण २१४ कोटी रूपये पर्यावरण संवर्धनासाठी खर्च करावयाचे होते. तसेच कंपनीला ऑर्डनन्स फॅक्ट्री लगत संरक्षण भिंत उभारावयाची होती. काल मी उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांना विनंती केली होती की कंपनीने संरक्षण भिंत बांधली आहे किंवा कसे याबाबत मौका पाहणी करण्यात यावी व कंपनीकडून याबाबत अक्षांश रेखांश सहीत माहिती मागविण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध आहे का याबाबत माहिती देण्यात यावी. याबाबतचा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अहवाला एक वर्षामध्ये सादर व्हायला पाहिजे होता परंतु तो सादर करण्यात आला नाही. याबाबतचा अहवाल केंद्र शासनापर्यंत पोहोचलेला नाही. तसेच कंपनीला खाणीमध्ये त्यांच्या एकूण वाहनांपैकी २० टक्के म्हणजेच ८.५० कोटी रूपयाची सीएनजी व एलएनजी वाहने वापरायची होती. कंपनीनेतर्फे याबाबत माहिती देण्यात यावी. सीएनजी व एलएनजी वाहनांचा वाहन क्रमांक सांगण्यात यावा. परवानगीच्या अटी व पर्यावरणीय मंजुरी अटींचे पालन स्थितीचे विवरण दिले जावे. | |

**५१) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूरः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने सर्वप्रथम कंत्राटदार बदलावा. तसेच अस्तित्वात असलेल्या पर्यावरण मंजूरीच्या अटी व शर्तींचे पालन करून प्रदूषणावर नियंत्रण करावे. तसेच स्थानिकांच्या समस्या सोडवाव्या व त्यानंतरच विस्तारीकरण प्रकल्पाला सुरूवात करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५२) श्री. नितेश बानव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | केपीसीएल मधील दोन व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्यात यावी. ही जनसुनावणी तात्काळ थांबवावी. पुनर्वसनाबाबत लेखी माहिती दिली जावी. ही खाण बंद करण्यात यावी. कंपनी सामान्य लोकांना माहिती देत नाही. कोणतीही रुग्णवाहिका, रोजगार, सुरक्षितता किंवा रस्त्यांची व्यवस्था नाही, त्यामुळे फेरफारही नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५३) श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीची माजरी येथे रेल्वे सायडींग असताना देखील कंपनीचा कोळसा विमला रेल्वे सायडींग येथे टाकण्यात येत आहे. मे. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील निकृष्ट दर्जाचा कोळसा १.५ रूपये प्रति किलो या दराने कंपनीचे कंत्राटदार विकत घेतात व यांच्या खाणीतून उत्खनन करण्यात येणाऱ्या कोळशामध्ये मिसळून कर्नाटक शासनाला विकला जातो. याबाबत खनिकर्म विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पंचनामा करण्यात आला व सदर पंचनामा फाडण्यात आला. सन २००७ मध्ये पर्यावरणीय मंजुरीत बंद कन्व्हेयर बेल्ट बसवण्याची अट होती, परंतु ती बसवलेली नाही. कंपनीने हायवेला बदलले आहे. येथे कोणतीही उच्च अधिकृत संस्था उपलब्ध नाही. स्थानिकांना रोजगार केव्हा मिळणार? सर्वांना न्याय मिळावा. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, मंडळाकडून कंपनीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली असून पुढील कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. |

## ५४) श्री. सुनिल नामोजवार, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीकडून होत असलेल्या प्रदूषण नियमांचे उल्लंघन प्रकरणी स्थानिक पर्यावरण विषयक संघटनांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, मंडळाकडून कंपनीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | केल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरवर्षी २०२२, २०२३ व २०२४ असे ३ आर्थिक वर्षात कंपनीचे अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कंपनीविरोधात गुन्हा दाखल का करण्यात आला नाही. | असून पुढील कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. |

## ५५) श्री. विशाल दुधे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०२४ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये "Why your consent shall not be revoked?" व 'Why you industrial activities shall not be closed down?" असे प्रश्न आपण कंपनीला विचारले होते. कंपनीकडून होत उल्लंघनाविरोधात कंपनीला प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपरोक्त प्रश्न विचारून उत्तर सादर करण्यास सांगितले होते. त्यानंतर सन २०२५ मध्ये आपणातर्फे कंपनीला परत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. संमतीपत्रातील अटी व शर्तीच्या उल्लंघनामुळे खाणकाम पुढील १५ दिवसांमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे बंद करण्यात येणार होते परंतु ते बंद करण्यात आले नाही. त्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास संमतीपत्र प्रदान केले आहे. सन २०२४ पासून कंपनीवर कारवाई प्रस्तावित असून देखील आजपर्यंत कंपनीवर कारवाई का करण्यात आली नाही. कंपनीचे खाणकाम बंद करण्यात यावे. बँक हमी जप्त करून कंपनीचे कोणतेही नूकसान होत नाही. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर ग्रामपंचयाती व स्थानिकांच्या तक्रारी करून देखील खाण बंद करू शकत नाहीत याबाबत मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना सांगावे. खाण बंद करण्याबाबतचे आदेश निघण्याबाबत आम्ही मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडे पाठपुरावा करू. कंपनीवर मागील दोन वर्षांपासून कारवाई करून देखील खाणपाण्यावर कंपनीतर्फे अप्रक्रियाकृत सांडपाणी नाल्यांमध्ये सोडण्यात येत असल्याने परिसरातील जलसाठे प्रदूषित होत असून खाणकाम आजपर्यंत बंद करण्यात आले नाही. कंपनीचे खाणकाम किती दिवसात बंद करण्यात येईल याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, मंडळाकडून कंपनीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली असून पुढील कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. उद्योगाची वेळोवेळी बॅक हमी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जप्त करण्यात आली आहे. बँक हमी जप्त करून देखील कंपनीतर्फे अटी व शर्तीचे पालन होत नसल्याने पुढील कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात अला असून तो मंडळाच्या विचाराधीन आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मंडळाने उत्तर द्यावे. कंपनीने ७ दिवसात खाणकाम बंद न केल्यास कंपनीकडून दर दिवसाला दंड वसूल करायला पाहिजे होते परंतु आपल्यातर्फे दंड वसूल करण्यात आलेला नाही. कंपनीची ५-१० लाखची बँक हमी जप्त करून कंपनीचे नूकसान होत नाही. आम्हाला कंपनीवर कठोर कारवाई अपेक्षित आहे कारण कंपनी पर्यावरणाच्या नियमांसोबत खेळ करत आहे. दोन दिवसांपूर्वी मी मा. कोळसा मंत्री यांच्याकडे कंपनीची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे. खाणी नजिकच्या गावांवर प्रदूषणामुळे परिणाम होत असून खाणीच्या विस्तारीकरणामुळे गावातून वाहूतक आणखी मोठ्या प्रमाणावर होणार आहे. कोणतीही औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (Effluent Treatment Plant), तलछट टाकी (Sedimentation Tank) किंवा हवा मापन प्रणाली उपलब्ध नाही. ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. परवानगीच्या अटी व पर्यावरणीय मंजुरी (EC) च्या सर्व अटी पूर्ण करण्यात याव्यात. | |

## ५६) <u>सरपंच, ग्रामपंचायत चिचोर्डी (महिला), ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी माझ्या प्रश्नाला उत्तर देत नाही. माझ्या भूखंडाची तसेच त्याच प्रकारच्या दुसऱ्या भूखंडाची मोजणी करण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ५७) <u>श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | यापूर्वी देखील कंपनी कोळसा घोटाळ्यामध्ये दोषी आढळली असून त्यावर सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल करून कंपनी बंद करण्यात आली. तरी देखील अशा काळ्या यादीतल्या कंपनीच्या विस्तारीकरणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जनसुनावणी घेते ही खूप ह्मोठी शोकांतिका आहे. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, कोणताही नवीन प्रकल्प सुरू करण्यापूर्वी जनसुनावणी घेणे ही एक प्रक्रिया आहे. |

## ५८) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण नियंत्रण मंडळ जनसुनावणी ही एक प्रक्रिया असल्याचे सांगते तर याठिकाणी विरोध करणार नागरीक मुर्ख आहेत का? अरविंदोची जनसुनावणी घेण्यात आली त्या प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध असताना देखील त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तक्रारी देण्याकरिता गेले असता अधिकारी गैरहजर राहतात. खाण बंद असताना त्यामध्ये अंदाजे १००-१५० कोटींचा कोळसा होता. त्या कोळशाचे काय झाले? कोळसा चोरी गेला कसा व त्यावर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी लक्ष का दिले नाही? कंपनीचे कार्यालय देखील या ठिकाणी नव्हते मागील २-३ महिन्यात या ठिकाणी कार्यालय सुरू करण्यात आले. कंपनीकडे माहितीच्या अधिकाराअंतर्गत अर्ज सादर केला तर कंत्राटदार म्हणतात की खाजगी कंपनीचा त्यामध्ये समावेश नाही. या सार्वजनिक सुनावणीची (PH) कार्यवाहीची प्रत आम्हाला कधी प्राप्त होणार आहे? तसेच त्यांनी कोळसा चोरी तात्काळ थांबवावी व स्थानिक नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, पर्यावरणविषयक जनसुनावणीची कार्यवाहीची प्रत माननीय सदस्य सचिव यांच्या मंजुरीसाठी मुख्यालयाकडे पाठविण्यात येईल. त्यानंतर ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. आपण ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या च्या संकेतस्थळावरून डाउनलोड करू शकता. |

## ५९) श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणकाम सन २००७ मध्ये सुरू झाले असून केपीसीएल (KPCL) यांना पुनर्वसनाबाबतचा आदेश नेमका केव्हा प्राप्त झाला, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सन २००७ ते २०१४ या कालावधीत, म्हणजेच माननीय सर्वोच्च न्यायालयाने कोळसा ब्लॉक रद्द करेपर्यंत, सलग ७ वर्षे खाणकाम करण्यात आले. सन २०१४ पासून पुढील ४ वर्षे खाणकाम बंद होते. त्यामुळे सन २००७ ते २०२५ या कालावधीत, सर्वोच्च न्यायालयाने कोळसा ब्लॉक रद्द केल्यापासूनचे ४ वर्षे वगळता, एकूण १८ | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, संबंधित कोळसा ब्लॉक सन २००३ मध्ये मंजूर करण्यात आला होता, उत्पादन सन २००८ मध्ये सुरू झाले आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाने तो मंजूर कोळसा ब्लॉक सन २०१४ मध्ये रद्द केला. कन्वेयर बेल्ट उपलब्ध करून देण्याची अट पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय (MoEF) यांनी सन २०२२ मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद |

| | | |
|---|---|---|
| | वर्षांच्या कालावधीत प्रत्यक्ष खाणकाम १४ वर्षे करण्यात आले आहे. या १४ वर्षांच्या कालावधीत केपीसीएलने गावांचे पुनर्वसन पूर्ण केलेले नाही, तरीही आता खाण विस्तारासाठी परवानगी मागितली जात आहे. | करण्यात आलेली असून त्याबाबतचा अहवाल आता तयार आहे. |

**६०) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पुनर्वसनाची प्रक्रिया प्रथम राबविण्यात यावी, प्रदूषण नियंत्रणासंबंधीच्या जुन्या अनुपालनांची पूर्तता एका महिन्यात करण्यात यावी व त्यानंतरच विस्तारासाठी सार्वजनिक सुनावणी (PH) घेण्यात यावी. कोळसा चोरीविरुद्ध कारवाई करण्यात यावी व स्थानिक नागरिकांवर होणारी दादागिरी थांबविण्यात यावी. सन २०२१ पासून गेल्या ५ वर्षांपासून खाणकाम सुरू आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) नोटीस प्राप्त होऊनही गेल्या १ वर्षापासून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रथम शेतकरी व प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवाव्यात, सर्व अनुपालनांची पूर्तता करावी व त्यानंतरच विस्ताराची प्रक्रिया हाती घ्यावी. शेतकऱ्यांकडून जमीन संपादित करताना खाणकाम आधी सुरू करायचे की पुनर्वसन प्रक्रिया आधी पूर्ण करायची, हे स्पष्ट करण्यात यावे. कंपनी केवळ खाणकामाबाबतच बोलत असून एकही पुनर्वसन पूर्ण झालेले नाही. पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण न करता केपीसीएल खाणकाम कशा प्रकारे करत आहे? पुनर्वसन अद्याप पूर्ण न झालेला असतानाही केपीसीएल खाणकाम कसे सुरू ठेवत आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**६१) निवृत्त एम्टा कर्मचाऱ्याची पत्नी:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे पती सन २००७ ते २०२४ या कालावधीत एम्टा (EMTA) कंपनीमध्ये कार्यरत होते. कंपनीने सेवानिवृत्तीचे कारण सांगून त्यांची सेवा समाप्त केली असून सेवानिवृत्तीवेतन व इतर देय लाभ अद्याप अदा | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | केलेले नाहीत. गेल्या सहा महिन्यांपासून ते बेरोजगार आहेत. आमची मुले शिक्षण घेत असून कंपनीने सेवानिवृत्तीचे देय लाभ न दिल्यामुळे आम्हाला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ते ६० वर्षांचे असल्याने त्यांना इतरत्र नोकरी मिळत नाही. | |

**६२) श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही कायदा व सुव्यवस्थेचा आदर करीत असल्यामुळे केपीसीएल येथे कार्यरत आहे; अन्यथा जनतेमध्ये इतका तीव्र असंतोष आहे की तुम्ही सुरक्षितपणे घरीही जाऊ शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**६३) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषण नियंत्रणासंदर्भातील प्रलंबित जुनी अनुपालने दोन महिन्यांच्या आत पूर्ण करून त्यानंतरच खाण विस्तारासाठी सार्वजनिक सुनावणी (PH) घेण्यात यावी. पुनर्वसनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसताना केपीसीएल खाणकाम कशा प्रकारे करीत आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) केपीसीएलला नोटीस दिलेली असताना देखील कोणतीही कारवाई झालेली नसल्याने मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करून खाण बंद करावी, अशी मागणी करण्यात आली. केपीसीएल एकाही नियमांचे पालन करत नसताना MPCB कडून खाणकामास परवानगी दिली जात आहे. कोढा गावातील नागरिक अपघातांमध्ये मृत्युमुखी पडत आहेत. केपीसीएलकडून नागरिकांना धमकावले जात असून कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलीस व प्रशासनामार्फत गावकऱ्यांवर दबाव आणला जात आहे. या सर्व अन्यायकारक परिस्थितीमुळे गावकरी खाणकामाच्या विरोधात आहेत. कंपनी केंद्र सरकारच्या | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अखत्यारित येत असली तरी केपीसीएलच्या कंत्राटदारांमार्फत काम करणाऱ्या कामगारांना राज्य शासनाच्या किमान वेतन धोरणानुसार केवळ रुपये १०,००० ते १२,००० इतके वेतन दिले जात आहे. त्याउलट डब्ल्यूसीएल (WCL) च्या कंत्राटदारांमार्फत काम करणाऱ्या कामगारांना रुपये २८,००० ते ३०,००० इतके वेतन मिळत आहे. प्रमुख नियोक्ता (Principal Employer) म्हणून केपीसीएलच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे की कंत्राटदारांकडून सर्व नियमांचे पालन होत आहे की नाही याची तपासणी करणे; मात्र केपीसीएल आपली ही जबाबदारी पार पाडत नाही. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने चालविण्यात येत असलेली ही कंपनी बंद करण्याची विनंती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास (MPCB) करण्यात आली. तसेच केपीसीएलच्या अधिकाऱ्यांना उर्वरित सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे, १ ते २ महिन्यांचा कालावधी घेण्याचे, प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आणि त्यानंतरच चर्चा करण्यास आम्ही तयार राहू, अन्यथा कोणतीही चर्चा ऐकण्यास आम्ही तयार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी सार्वजनिक सुनावणी (PH) रद्द करण्याबाबत घोषणाबाजी केली. | |

**६४) <u>श्री. विठ्ठल पुनवटकर, उप-सरपंच बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेतकऱ्यांकडून जमीन संपादन करताना केपीसीएलने ७ वर्षांनंतर प्रति एकर रुपये ४ लाख अदा करण्याचे किंवा पुनर्भरण (reclamation) केल्यानंतर ५० टक्के जमीन परत देण्याचे मान्य केले होते. सदर रक्कम केपीसीएल कधी अदा करणार आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६५) <u>श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चिरोली गावाजवळील कोळसा वाहतुकीचा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. ग्रामपंचायतीमार्फत रस्ता दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करूनही केपीसीएलने आजपर्यंत सदर रस्त्याची दुरुस्ती केलेली नाही. माझी शेती या रस्त्यालगत असून, शेतात जाताना मोठ्या प्रमाणात धूळ साचलेली दिसून येते. केपीसीएलचे अधिकारी भ्रष्ट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी कोळसा वाहतूक रस्त्यावर झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला असतानाही केपीसीएलचे अधिकारी त्याची गंभीर दखल घेत नाहीत. अलीकडेच कंपनीच्या वाहनामुळे याच रस्त्यावर माझाही अपघात झाला. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६६) <u>श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माननीय जिल्हाधिकारी यांना पर्यावरणविषयक जनसुनावणी रद्द करण्याचा अधिकार आहे कारण लोक सार्वजनिक सुनावणीच्या विरोधात आहेत. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, स्थानिक लोक त्यांच्या समस्या उपस्थित करू शकतात आणि त्या समस्यांची नोंद इतिवृत्तामध्ये केली जाईल. |

६७) <u>श्री. विठ्ठल पुनवटकर, उप-सरपंच बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पूर्वी झरी-जामणी येथे पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती, जी जिल्हाधिकारी यांनी रद्द केली होती. मा. अध्यक्षांना विनंती आहे की, त्यांनी ही जनसुनावणी रद्द करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६८) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने जुनी अनुपालने पूर्ण करावी, पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करावी आणि नुकसानभरपाईची रक्कम दोन महिन्यांच्या आत द्यावी. त्यानंतरच विस्तारीकरणासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करावी. आपण केवळ केपीसीएलसाठीचे जिल्हाधिकारी नाही, तर सामान्य लोकांसाठीही जिल्हाधिकारी आहात; तसेच लोकांच्या तीव्र नाराजीचा विचार करून, आपल्याला पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द करण्याचा अधिकार असल्यामुळे, झरी-जामणी येथे आयोजित पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द केल्याप्रमाणे, ही पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द करा. ही पर्यावरण विषयक जनसुनावणी सर्व अनुपालन पूर्ण केल्यानंतर पुन्हा आयोजित केली गेली तर तीच लोक पर्यावरण विषयक जनसुनावणीला स्वागत करतील आणि सकारात्मक प्रतिसाद देतील. माझी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांना विनंती आहे की त्यांनी सदर जनसुनावणी रद्द करावी. जुन्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता कंपनी कडून करून घ्यावी व त्यानंतरच जनसुनावणी घेण्यात यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, लोक आपल्या समस्या मांडू शकतात आणि त्या समस्यांची नोंद इतिवृत्तामध्ये केली जाईल. लोक लेखी निवेदन देखील देऊ शकतात. आम्ही ते वरिष्ठांकडे सादर करू आणि निर्णय उच्च स्तरावर घेण्यात येईल. जनसुनावणी रद्द करण्याचा निर्णय या ठिकाणी मी घेऊ शकत नाही. |

६९) श्री. विठ्ठल पुनवटकर, उप-सरपंच बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने रू. ४.० लाखप्रमाणे मोबदला घोषित केला होता ते केव्हा मिळणार याची माहिती देण्यात यावी. एकूण १२६९ नागरीक मोबदल्याच्या प्रतिक्षेत आहे. कंपनी स्थानिकांना मोबदला कधी देणार आहे याची माहिती देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७०) श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, किलोनी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांना प्रश्न आहे की महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत एकही जनसुनावणी रद्द झाली नाही का? प्रादेशिक अधिकारी यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे. जनसुनावणी रद्द करण्याचे अधिकार कोणाला आहे? माझा जिल्हाधिकारी यांना देखील हाच प्रश्न आहे. जनसुनावणी रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे. जर प्रशासन देखील बरबटलेलं असेल तर त्यापेक्षा मोठी शोकांतिका आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नूसार पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे. आम्ही गावकऱ्यांनी वेळोवेळी कंपनीच्या प्रदूषणाबाबत तक्रारी व निवेदने दिली होती परंतु त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे व ते शासनापर्यंत पोहचविण्यात येईल. |

७१) श्री. विक्रांत नागपुरे, प्रकल्पग्रस्त, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या जागेवर अवार्ड लागला असताना रू. ४.०५ लाख प्रमाणे मोबदला निश्चित झाला असताना केपीसीएल नावाने ७/१२ झालाच कसा? गावकऱ्यांना मोबदला न देता कंपनीच्या नावावर ७/१२ होतोच कसा? मी किमान १२ वेळा ५२ लोकांच्या जमीनीबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदने दिली परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. किलोनी गावाजवळील रस्त्याची स्थिती खराब झाली आहे. प्रस्ताव दिला गेला होता, परंतु आजपर्यंत कोणतीही सुधारणा झाली नाही. कंपनी लोकांना व्यवस्थापित करत आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७२) **श्री. विशाल दुधे, प्रकल्पग्रसत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक जनता मागील अर्ध्या तासापासून जनसुनावणी रद्द करण्याची विनंती करत आहे. प्रशासनाने जनसुनावणी रद्द करावी. कंपनीने पर्यावरणीय मंजूरीचे अनुपालन केल्यानंतर सदर जनसुनावणी परत घेण्यात यावी. मला जनसुनावणीची रेकॉर्डिंग उपलब्ध करून द्यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द करण्याचे अधिकार माझ्याकडे नाहीत. त्याबाबत मा. जिल्हाधिकारी निर्णय घेतील. |

७३) **श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही सर्व स्थानिक नागरीक या जनसुनावणीचा निषेध करतो व जनसुनावणीचा मंडप सोडत आहे. आपणाकडे अधिकार असताना आपल्यातर्फे रद्द करण्यात येत नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७४) **श्रीमती माधुरी विनोद बर्वे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या पतीचा दि. ०२/०७/२०२३ रोजी खाणीमध्ये मृत्यू झाला होता. कंपनीतर्फे रू. २०.० लाख मोबदला व घरातील एका व्यक्तिला नौकरी देण्याचे आश्वासन कंपनीने दिले होते. मला कंपनीतर्फे कंत्राटीतत्त्वावर नौकरी देण्यात आली. परंतु माझी विनंती आहे की मला कायमस्वरूपी नौकरी देण्यात यावी. मला नौकरी मिळून ३० महिन्यांचा कालावधी होऊनही भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेचा हप्ता माझ्या वेतनामधून कपात करण्यात येत नाही. माझा मुलगा शिक्षण घेत आहे. या जनसुनावणीबाबत बंद करण्याचा निर्णय निवासी उप-जिल्हाधिकारी यांनी जाहीर करावा. ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. २ ते ३ महिन्यांनी पुन्हा आयोजित करावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपणांस सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, ही जनसुनावणी रद्द केली जाऊ शकत नाही. |

७५) **श्री. पुंडलिक घोरपडे, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सन २००७ ते २०२४ या कालावधीत एम्टा (EMTA) कंपनीमध्ये कार्यरत होतो. कंपनीने सेवानिवृत्तीचे कारण सांगून माझी सेवा समाप्त केली असून सेवानिवृत्तीवेतन व इतर देय लाभ अद्याप अदा केलेले नाहीत. गेल्या सहा महिन्यांपासून मी बेरोजगार आहेत. मला कंपनी बंद असलेल्या कालावधीचा ५ वर्षांचे वेतन मिळालेले नाही. माझी मुले शिक्षण घेत असून कंपनीने सेवानिवृत्तीचे देय लाभ न दिल्यामुळे मला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. माझे वय ६० वर्षांचे असल्याने मला इतरत्र नोकरी मिळत नाही. अध्यक्षांकडे ही जनसुनावणी रद्द करण्याचा अधिकार आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आमच्या माहितीप्रमाणे आमच्याकडून आपणांस सर्व प्रकारचे देयक अदा करण्यात आली आहेत. परंतु तरी देखील आपल्या समस्यांचा विचार करून योग्य ते निर्णय घेण्यात येईल. कंत्राटी तत्त्वावर आपणांस रोजगार उपलब्ध करण्याबाबत प्रयत्न केले जातील. |

७६) **श्री. प्रविण ठेंगणे, माजी सभापती, पंचायत समिती भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी बरेच मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. मी माझे लेखी आक्षेप समितीपुढे सादर करत आहे. आमच्या कुटुंबातील कोणालाही रोजगार मिळालेला नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

७७) **बरांज मोकासा गावातील रहिवासी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी बरांज मोकासा या गावाचा नागरीक आहे व माझी या ठिकाणी ८.५ एकर जमीन आहे. कंपनीने माझी ७.५ एकर जमीन अधिग्रहीत केली परंतु माझ्या परिवारातील एकाही सदस्याला नौकरी दिलेली नाही. मी माझ्या मुलाल नौकरी देण्याची मागणी केली परंतु कंपनीने त्याला नौकरीवर घेतलेले नाही. पैसे न दिल्याशिवाय कंपनीच्या नावावर ७/१२ बदल कसा केला गेला? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ७८) श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक नागरीकांपैकी ९० टक्के नागरीकांचा या जनसुनावणीला विरोध असताना देखील जनसुनावणी रद्द करण्यात येत नाही ही एक शोकांतिका आहे. KPCL ने माझ्याविरुद्ध पोलिस कारवाई कशी केली? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ७९) श्री. धीरज पुनवटकर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी माझे लेखी निवेदन सादर करत आहे. खाण सुरू राहिली तर स्थानिकांचे प्रश्न सुटतील. खाण बंद राहिली तर स्थानिक नागरीकांचे प्रश्न सुटणार नाही. माझा या प्रकल्पाला पाठिंबा आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ८०) प्रकल्प प्रवर्तकांतर्फे देण्यात आलेली उत्तरे खालीलप्रमाणे आहेत:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कंपनीतर्फे पुनर्वसनाकरिता एकूण दोन गावांकरिता रू. २१६ कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत. पुनर्वसनाचे धोरण महाराष्ट्र शासन व कर्नाटक शासन यांच्यामध्ये तयार करण्यात आली होती. पुनर्वसनाची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात येत आहे. नागरीकांच्या काही समस्या असल्यास त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा व जिल्हा प्रशासनाच्या आदेशानूसार कंपनीतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर विस्तारीकरण प्रकल्पाकरिता चिचोर्डी गावातील १८५ हेक्टर जमीन अधिग्रहीत करावयाची आहे. त्याकरिता पुढील एक महिन्याच्या कालावधीमध्ये प्रशासनाकडे अर्ज सादर करण्यात येईल व जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार जमीन अधिग्रहण करण्यात येईल. सद्य:स्थितीत खाणीमध्ये एकूण १४४६ कामगार कार्यरत असून त्यापैकी ९५० स्थानिक कामगार आहेत व ४८५ तज्ञ कामगार हे परप्रांतीय आहेत. स्थानिक नागरीकांना ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत नौकऱ्या देता येईल याबाबत प्रयत्न कंपनी प्रशासनातर्फे करण्यात येतील. आमच्याकडून अस्तित्वात असलेल्या पर्यावरणीय मंजूरीच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे. १८/१२/२०२५ रोजी पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडून त्याबाबत तपासणी करण्यात आली असून त्यांच्यातर्फे प्रमाणित करण्यात आले आहेत. गावकऱ्यांना आवश्यक असल्यास त्यांना या अहवालाची प्रत देण्यात येईल. तसेच सदर अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर देखील पाहता येऊ शकते. निस्तार हक्काबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून रू. ६.९७ कोटी रूपयांचा मोबदला देण्यात आला आहे. प्रकल्पाच्या विस्तारीकरणानंतर कोंढा गावातील वाहतूकीची समस्या आणखी वाढणार असल्याची आम्हाला कल्पना असून त्याकरिता आम्ही विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर |

| | |
|---|---|
| | (VNIT) व रेल इंडिया तांत्रिक व आर्थिक सेवा लिमिटेड, नवी दिल्ली (RITES Ltd.) या दोन संस्थांकडून अहवाल मागविला असून प्रकल्प अहवाल तयार करून मागविण्या आला आहे. त्यामध्ये प्रकल्पाला लागणारा खर्च व कालावधी याची माहिती मिळणार आहे. सदर काम पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार करण्यात येईल. खाणी परिसरामध्ये नियंत्रित ब्लास्टींग खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार करण्यात येते. कोंढा नाल्यामध्ये कंपनीतर्फे कोणत्याही प्रकारचे अप्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्यात येत नसून प्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्यात येते. तसेच पर्यावरणी, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार प्रक्रिया सयंत्रणा बसविण्यात आल्या आहेत. धुळ नियंत्रणाकरिता आमच्याकडून २८ किलोलिटर क्षमतेचे २ पाण्याचे टँकर, १२ किलोलिटर क्षमतेचे ०४ पाण्याचे व ०९ किलोलिटर क्षमतेचे ०२ पाण्याचे टँकर्स वापरण्यात येतात. सद्य:स्थितीत ०१ कॅनॉन फॉगर असून कॅनॉन फॉगर्सची संख्या गरज असल्यास वाढविण्याबाबत तरतूद देखील करण्यात येणार आहे. |

**८१) श्री. मारूती चंदनवार, माजी उप-सरपंच, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पाच वर्षांपूर्वी खाण सुरू करण्यात आली. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळायला पाहिजे व गावाचे पुनर्वसन व्हायला पाहिजे. स्थानिकांच्या समस्याचे निराकरण कंपनीने करावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**८२) श्री. विठ्ठल पुनवटकर, उप-सरपंच बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २००७ मध्ये कंपनीद्वारे सांगण्यात आले होते की, शेतकऱ्याची ५० टक्के जमीन वापस करण्यात येईल किंवा एकरी ४.० लाख रूपये प्रमाणे मोबदला देण्यात येईल. परंतु ती रक्कम आजपर्यंत गावकऱ्यांना मिळालेली नाही. मोबदला केव्हा देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. कंपनीला दि. ०७/०२/२०१३ रोजी अवार्ड घोषित झाला. परंतु आम्हाला आजच्या नियमाप्रमाणे मोबदला का देण्यात येत नाही. जमीनी आम्हाला कधीपर्यंत परत मिळणार याची माहिती देण्यात यावी. शासनासोबत रू. ४.०५ लाख या प्रमाणे करार करण्यात आलेला आहे परंतु मोबदला मिळालेला नाही. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४ नूसार कंपनीकडे रू. ३.४० कोटी रूपये थकीत आहे. कंपनीने आजपर्यंत कर अदा केलेला नाही. ती रक्कम कंपनी केव्हा अदा करणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे गावकऱ्यांना १५.० लाख रूपये | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपण कंपनीकडे अर्ज सादर करावा. आपल्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ग्रामपंचायतीला लवकरात लवकर कर अदा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात येत आहे. भद्रावती सारख्या शहरात रू. १५.० लाख रूपयात जमीन खरेदी नाही करू शकत इमारत कसे बांधणार? अरविंदो कंपनीतर्फे इमारतीचे रू. २६.० लाख प्रमाणे मोबदला देण्यात येत आहे. या ठिकाणी गावकऱ्यांना अरविंदोच्या तुलनेत रू. ९.० लाखांचा तोटा सहन करावा लागत आहे. कंपनीने गावाचे पुनर्वसन करावे व पुनर्वसनाच्या ठिकाणी सर्व सोईसुविधा पूरवाव्यात. जनसुनावणी समितीला विनंती करतो की सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. | |

**८३) श्री. जगदीश लवाडीया, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शासन व केपीसीएल यांच्यात दिनांक १५ डिसेंबर २०१६ रोजी करार करण्यात आला होता. या करारातील कलम १०.३ नुसार स्थानिक युवक व बेरोजगार नागरिकांच्या प्रशिक्षणासाठी रुपये ५० लाख निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र स्थानिक नागरिकांना केवळ रुपये १०,००० वेतनावर सुरक्षा रक्षक म्हणून काम दिले जात आहे, तर बाहेरील व्यक्तींना रुपये ४०,००० वेतनावर ऑपरेटर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच करारातील कलम १०.३ नुसार औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (ITI) स्थापन करण्यासाठी रुपये ५० लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला होता; तथापि, अद्याप असे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (ITI) केंद्र स्थापन करण्यात आलेले नाही. कोळसा खाण ते माजरी रेल्वे सायडींगपर्यंत मोठ्या प्रमाणात धूळीचे प्रदूषण होत असून कंपनीने त्याबाबत कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. कंपनीतर्फे धूळीवर नियंत्रण करण्याकरिता कॅनॉन फॉगरद्वारे फवारणी करणे गरजेचे आहे. कंपनीने कागदोपत्री कॅनॉन फॉगर दाखविलेले असून प्रत्यक्षात कॅनॉन फॉगरची व्यवस्था केलेली नाही. कंपनीने खाण परिसरामध्ये कॅनॉन फॉगर बसविलेले असून वाहतूकीच्या रस्त्यावर सर्वात जास्त गरज असताना कॅनॉन फॉगर बसविलेले नाही. स्थानिक युवकांच्या बेरोजगारीचा खूप मोठा प्रश्न या क्षेत्रामध्ये आहे. कंपनीने जिल्हा प्रशासनाकडे रू. ५०.० लाख जमा केल्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी माहिती द्यावी. या परिसरात उच्च शिक्षीत युवक असून देखील कंपनी परप्रांतीय लोकांना | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतर्फे खाणीमध्ये एक कॅनॉन फॉगर बसविलेले असून त्याची संख्या वाढविण्यात येईल. कंपनीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी रू. ५०.० लाख जमा करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, याबाबत चौकशी माहिती देण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक नागरीकांना पर्यवेक्षक व सहाय्यक व्यवस्थापक या पदावर नौकऱ्या देण्यात आल्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | उच्च पदावर नोकऱ्या देत आहेत. स्थानिक नागकरीकांना फक्त सुरक्षा रक्षक पदावर काम करण्यासाठी त्यांच्या जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत का? सर्व गावकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध असताना ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी अशी आमची विनंती आहे. | |

८४) **श्री. जितेश बनोत, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने बरांज मोकासा, कोंढा, कढोली व इतर गावातील किती स्थानिकांना नौकऱ्या दिलेल्या आहेत याची माहिति देण्यात यावी. आम्ही येथील स्थानिक रहिवाशी असून आम्हाला येथे प्रकल्पामध्ये नौकरी देण्यात येत नाही. माझे वय २७ वर्षे झाले असून कंपनीने आजपर्यंत मला नौकरी दिलेली नाही. जेव्हापासून कंपनी कार्यरत आहे तेव्हापासून कंपनीचा भोंगळ कारभार चालु असल्याचे निदर्शनास येत आहे. कंपनीने स्थानिकांसाठी काहीही केलेले नाही. मी स्वत: कंपनीमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून काम केले असून आजपर्यंत मला भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळालेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्त गावांमधून एकूण २७० प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना खाणीमध्ये नौकरी देण्यात आली आहे. तसेच शेजारच्या गावातील ६८५ व्यक्तिंना नौकरी देण्यात आली आहे. |

८५) **श्री. फिरभा सरबंदन गडपी, बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने आमच्या गावातील जमीन अधिग्रहीत केल्या आहेत व त्याचा मोबदला देण्यात येत आहे. कंपनीने प्रकल्पग्रस्त कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिला नौकरी देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु काही नागरीकांनी मोबदला घेण्यास नकार दिला असून नौकरीची मागणी का केलेली आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे सांगण्यात येत आहे की सन २००९ नूसार स्थानिकांना रू. ११०००/- प्रमाणे मोबदला देण्यात आला आहे. सदर रकमेचा धनादेश स्थानिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जाऊन प्राप्त करून घ्यावा. सन २००९ चा धनादेश सन २०२५ मध्ये प्राप्त करून घेण्याचे सांगण्यात येत आहे. परंतु सदर तुटपुंज्या रकमेमध्ये सन २०२५ मध्ये जागा उपलब्ध होऊ | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पुनर्वसनाच्या नियमानूसार कंपनीतर्फे नौकरी व मोबदला या दोन्ही सुविधा देण्यात येतात. तसेच प्रकल्पग्रस्तांपुढे दोन पर्याय ठेवण्यात येतात. एक तर मोबदला व नौकरी किंवा फक्त मोबदला. जर कंपनी काही कारणांमुळे प्रकल्पग्रस्त व्यक्तिला नौकरी देऊ शकत नसेल तर प्रकल्पग्रस्तांना पूर्ण मोबदला देण्यात येतो. कंपनीतर्फे त्याकरिता पर्याय अर्ज देण्यात येतो. तसेच याबाबत आणखी सविस्तर माहिती हवी असल्यास कंपनीच्या कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा. आपणांस संपूर्ण माहिती देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | शकते काय याबाबत कंपनीने माहिती द्यावी. तसेच ते शक्य न झाल्यास कंपनीने माझ्या घराइतकी जमीन खरेदी करून द्यावी. | |

ऑनलाईन माध्यमातून कोणताही सहभागी उपस्थित नव्हता. पर्यावरणीय जनसुनावणीदरम्यान संपूर्ण कालावधीत ऑडिओ व व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(डॉ. नितीन व्यवहारे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर.